रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २९०
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, ९ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आरटीई प्रवेशासाठी आता १५ मेपर्यंत मुदतवाढ



**पुणे** : शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेमध्ये निवड यादीत प्रवेश जाहीर झालेल्या मुलांच्या प्रवेशासाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता पालकांना १५ मेपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी राज्यात आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यंदा या प्रवेश प्रक्रियेंतर्गत आठ हजार ८२३ शाळांमध्ये एक लाख एक हजार ८४६ जागा उपलब्ध झाल्या. या जागांसाठी तीन लाख ६४ हजार ४१३ बालकांच्या पालकांनी अर्ज केले. प्रवेशासाठीच्या सोडतीनंतर ९४ हजार ७०० विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर करण्यात आली. १३ एप्रिलपासून प्रवेश निश्चिती सुरू झाल्यापासून या प्रक्रियेत थंड प्रतिसाद असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आलाय.

### अंतरंग
राज्यस्तरीय खरीप हंगाम पीक स्पर्धेचा निकाल जाहीर/२
कर्जतमध्ये १९ जनावरांना विषबाधा; चार दगावली/५
पनवेल चॅम्पियन्स लीगचा 'स्मित स्मॅशर्स' मानकरी/८

# राज्यातील महाविकास आघाडीत असंतोष

## स्नेहल जगतापांच्या प्रवेशाने ठाकरे गटावर काँग्रेस नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडीमध्ये मोठा असंतोष पहायला मिळत आहे. नेत्यांचे पक्षांतर आणि परस्परविरोधी विधाने यावरून शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमध्ये धुसफूस दिसून येत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होऊ शकते, अशा चर्चेला उधाण आले आहे.



महाडच्या माजी नगराध्यक्ष आणि काँग्रेस नेत्या स्नेहल जगताप यांच्या ठाकरे गटातील प्रवेशाने महाविकास आघाडीत असंतोष उफाळून आला आहे. जगतापांच्या प्रवेशावरून काँग्रेस पक्ष हा ठाकरे गटावर नाराज झाला असून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी याबाबत माजी मुख्यमंत्री व ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंबद्दल नाराजी बोलून दाखविली आहे.

काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस स्नेहल जगताप यांनी दोन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे गटात प्रवेश केला. महाडमध्ये शनिवारी शिवगर्जना सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उद्धव ठाकरेंच्या प्रमुख उपस्थितीत जगताप यांनी पक्षप्रवेश केला. या सभेस माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, राज्याचे माजी मंत्री सुभाष देसाई, महिला नेत्या सुषमा अंधारे आदी उपस्थित होते.

स्नेहल जगताप या गेल्या अनेक महिन्यांपासून ठाकरे गटात जाण्यास इच्छूक होत्या. सहा महिन्यांपूर्वी जगताप यांनी उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर काँग्रेसने जगताप यांना पक्षात प्रवेश देऊ नये, अशी विनंती उद्धव ठाकरे यांना केली. त्यामुळे हा प्रवेश रखडला होता, मात्र अखेर दोन दिवसांपूर्वी जगताप यांचा पक्षप्रवेश झाला. याबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता आगामी काळात काँग्रेस विरुद्ध ठाकरे गट असा सामना रंगण्याची चिन्हे दिसत आहेत.

### उद्धव ठाकरे यांनी ऐकले नाही -नाना पटोले

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, आम्ही उद्धव ठाकरे यांना असे करू नका सांगितले होते, पण तरी त्यांनी ते केले व स्नेहल जगताप यांना पक्षात प्रवेश दिला. ही त्यांची चूक आहे. महाविकास आघाडीतील पक्षाला कमजोर करण्याचे काम होत असेल, तर ते चुकीचे आहे. आघाडीची जेव्हा बैठक होईल तेव्हा हा मुद्दा उपस्थित केला जाईल. महाडची जागा काँग्रेसची आहे आणि आम्ही ती लढणार आहोत. पटोले यांनी पुढे बोलताना पक्षांतर करणाऱ्या नेत्यांना पक्षात घेतले नाही पाहिजे, असे आमचे मत आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी यांनी घेतलेले आमचे नेते परत करावेत, अशी मागणीही या वेळी केली.

## राऊत विरुद्ध राष्ट्रवादी 'सामना'

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या राजीनाम्यावर उद्धव ठाकरे गटाने टीका केली आहे. पवार देशातील मोठे नेते आहेत, मात्र त्यांचा पक्ष पुढे नेईल असा वारसदार निर्माण करण्यात ते अपयशी ठरले आहेत, असे ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या दै. सामनाच्या अग्रलेखात कार्यकारी संपादक खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. यावर राष्ट्रवादीकडून तीव्र प्रतिक्रिया आल्या आहेत.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणाले, शरद पवार यांनी लोक माझे सांगाती पुस्तकात जे म्हटलंय त्यावर उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे, पण संजय राऊतांना हे सगळे उकरून काढायची काय गरज आहे? त्यांना काय अडचण आहे? त्यांना असे वाटते का, की राष्ट्रवादीने



महाविकास आघाडीतून बाहेर पडायला पाहिजे.

संजय राऊतांचे जेवढे आयुष्य आहे, तेवढे शरद पवारांचे राजकारण आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील असे नेतृत्व करणारे नेते आहेत, असे सांगून शिंदे गटावर लक्ष ठेवले असते, तर आज आपल्याला बाहेर बसावे लागले नसते व अशी परिस्थिती आली नसती, असेही भुजबळ यांनी म्हणत निशाणा लगावला आहे.

**एखादी व्यक्ती मनाला वाटेल तसे काहीही बोलत असेल, तर त्यांच्या मताला महत्त्व देण्याचे काहीही कारण नाही. संजय राऊत यांचे मत तसे असले तरी महाराष्ट्रातील जनतेचे तसे मत नाहीये.**
**-अजित पवार, राष्ट्रवादीचे नेते**

## कर्नाटकात पूर्ण बहुमताने भाजपचे सरकार येणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराच्या तोफा सोमवारी (दि. ८) थंडावल्या. कर्नाटकात भाजप-काँग्रेसमध्ये थेट लढत आहे. अशात कर्नाटकात भाजपचे सरकार स्थापन होणार असल्याचा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे.

केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले की, मी कर्नाटकातील सर्व भागांचा दौरा केला आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा सर्वच भागात भाजपचा वाढता प्रभाव आहे. लोकांचा उत्साह आणि मिळणारा पाठिंबा पाहता भाजप पूर्ण बहुमताने सरकार स्थापन करेल.



### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा विश्वास

काँग्रेसवर हल्लाबोल करताना त्यांनी म्हटले की, भाजपने चार टक्के मुस्लिम आरक्षण संपवले आहे, कारण ते घटनाबाह्य होते. आपल्या राज्यघटनेत धर्माच्या आधारावर आरक्षणाची तरतूद नाही. काँग्रेसने तुष्टीकरणाच्या धोरणाखाली मुस्लिम आरक्षण दिले होते, ते आम्ही काढून टाकले आहे.

मला एवढेच सांगायचे आहे की, जर तुम्हाला मुस्लिम आरक्षण चार टक्क्यांवरून सहा टक्के करायचे असेल, तर ते इतर समाजाचे कमी करणार आहेत. ओबीसी, एससी, एसटी, लिंगायत की वोकलिंग ते कोणाचे आरक्षण कमी करणार हे काँग्रेस पक्षाने आधी स्पष्ट केले पाहिजे. आम्ही आरक्षण खूप विचारपूर्वक केले आहे. अनुसूचित जमातीच्या आरक्षणामध्ये काही मर्यादा निश्चित केल्या आहेत. काँग्रेसला त्या हटवायच्या आहेत, पण मी स्पष्ट करू इच्छितो की, जे आरक्षण एससीच्या आरक्षणात आहे ते हटवले जाणार नाही.

## मुंबईत होणाऱ्या जी-२० बैठकीच्या पूर्वतयारीचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

जी-२० अंतर्गत तिसऱ्या एनर्जी ट्रान्झिशन वर्किंग ग्रुपच्या बैठकीचे आयोजन मुंबई येथे १५ ते १७ मेदरम्यान करण्यात आले आहे. यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाचा आढावा घेण्यासाठी सोमवारी (दि. ८) मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी बैठक घेतली. या बैठकीत नवी दिल्लीतून केंद्रीय ऊर्जा सचिव आलोक कुमार यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग घेतला.

मंत्रालयात झालेल्या बैठकीस पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, ऊर्जा विभाग प्रधान सचिव आभा शुक्ला, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त वेलारासू, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, उद्योग विकास आयुक्त माणिक गुरसळ, माहिती संचालक हेमराज बागूल, सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदी उपस्थित होते.

मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी सांगितले की, बैठकीसाठी येणाऱ्या प्रतिनिधींना आवश्यक असणाऱ्या सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी संबंधित विभागांनी समन्वय अधिकारी नियुक्त करावे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. केंद्रीय ऊर्जा सचिव आलोक कुमार यांनी राज्य शासनाच्या वतीने अपेक्षित सहकार्य याबाबत माहिती दिली.

बैठकीस उद्योग विभागाचे सहसंचालक सुरेश लोंढे, मुंबई महापालिका उपायुक्त मनीष वळंजू, विनायक विसपुते आदी उपस्थित होते.





**पनवेल : डॉ. शंकर चोपडे व डॉ. सुवर्णा चोपडे यांनी कामोठे येथे नव्याने आर. व्हिजन ॲडव्हान्स डायग्नोस्टिक सेंटर सुरू केले असून त्याचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी चोपडे कुटुंबीयांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे आदी उपस्थित होते.**

### निवडक

**केरळ बोट दुर्घटनेतील मृतांचा आकडा २२वर**

**तिरूवनंतपूरम** : केरळच्या मलप्पूरममधील तनूर भागात रविवारी (दि. ७) संध्याकाळी ४० प्रवाशांना घेऊन जाणारी हाऊसबोट उलटली. या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता २२वर पोहचली असून सात जणांची प्रकृती गंभीर आहे. या प्रकरणी बोटीच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

**राजस्थानमध्ये आढळला लिथिअमचा मोठा साठा**

**जयपूर** : राजस्थानमध्ये लिथिअम खनिजाचा मोठा साठा आढळून आला आहे. यातून भारताची ८० टक्के लिथियमची मागणी पूर्ण होऊ शकते. भारतात पहिल्यांदा जम्मू-काश्मीरमध्ये लिथिअमचा साठा आढळून आला होता. त्यापेक्षा कितीतरी पटींनी मोठा साठा आता राजस्थानातील दैगाना (नागौर) येथे आढळला आहे.

## पनवेलमध्ये किड्स समर कॅम्प उत्साहात

■ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने किड्स समर कॅम्पचे मोफत आयोजन करण्यात आले होते. हा कॅम्प शहराच्या मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणेश मंदिरात ५ ते ७ मेदरम्यान उत्साहात झाला. या ठिकाणी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. ७) भेट देत बक्षीस वितरण केले.

या कॅम्पमध्ये क्राफ्ट, पेंटिंग, डान्स, ॲक्टिंग वर्कशॉप तसेच योगा याबाबत मुलांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यास मुलांनी प्रतिसाद देत आनंद लुटला.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष मयुर खिस्मतराव, टीडब्ल्यूटीच्या अस्टिस्टंट मॅनेजर दिप्ती खिस्मतराव, सायली पराडकर, दिपश्री खेडकर, प्रदीप शहा, मंडळाचे उपाध्यक्ष शेखर मंजुळे, सचिव गणेश मंजुळे, खजिनदार हितेश चौधरी, सदस्य नितीन तांबोळी, मनीष शहा, किरण चंदने, आदित्य डिंगोरकर, अमित जगनाडे, रवी चंदने, कुणाल नसरे, अभिषेक खिस्मतराव, शिवराज साखरे, प्रतिक चौधरी, मनोहर परदेशी आदी उपस्थित होते.

## शिर्डीचा होणार कायापालट; निधी मंजूर

### साईभक्त आनंदले!

**अहमदनगर : प्रतिनिधी**


शिर्डी शहराचा कायापालट करणाऱ्या सौंदर्यीकरणाच्या पहिल्या टप्प्यातील ५२ कोटींच्या कामांचा प्रस्तावित विकास आराखडा राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सोमवारी (दि. ८) साईबाबाचरणी अर्पण केला. शिर्डी शहर व परिसराबद्दल देशभरातील भाविकांमध्ये आत्मियता वृद्धिंगत व्हावी यासाठी शिर्डीचा येत्या काळात



अंर्तबाह्य कायापालट करण्यात येणार आहे. त्यामुळे साईभक्तांमध्ये आनंद पसरला आहे.

महसूलमंत्री विखे-पाटील यांनी साईबाबा समाधी मंदिरात दर्शन घेत शहर सौंदर्यीकरणाच्या आराखड्याची प्रत साईचरणी अर्पण केली. शिर्डी संस्थान सभागृहात वास्तूविशारद तज्ज्ञ अजय कुलकर्णी यांनी या सौंदर्यीकरण आराखड्याचे चित्रफितीच्या माध्यमातून सादरीकरण केले. त्यानंतर पत्रकारांशी महसूलमंत्र्यांनी संवाद साधला. शिर्डीचे खासदार सदाशिवराव लोखंडे, शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. सिवाशंकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहूल जाधव, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे, राहाता तहसीलदार अमोर मोरे उपस्थित होते.

विकासशील शिर्डी, सुंदर शिर्डी, आनंददायी शिर्डी अशी प्रतिमा शिर्डीची होईल यावर भर राहणार असल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी या वेळी सांगितले.



# जनतेच्या समस्या सोडविण्यावर भर द्या

■ आमदार निरंजन डावखरे यांचे खालापूर येथे भाजप कार्यकर्त्यांना आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार व राज्यात शिवसेना-भाजप सरकार असल्याने शेवटच्या घटकापर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचून जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करा. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा, असे आवाहन भाजपचे कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी केले.

पाली फाटा येथील पक्षाच्या खालापूर तालुका संपर्क कार्यालयात सोमवारी दुपारी तीन वाजता निरंजन डावखरे यांचे आगमन झाले. यावेळी तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे व जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव यांनी डावखरे यांचे स्वागत केले.

यावेळी डावखरे यांनी संघटनात्मक कामाचा विस्तृत आढावा घेताना, तालुक्यातील विविध विकास कामांबाबतही सविस्तर चर्चा केली. या बैठकीला खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव, तालुका सरचिटणीस शशिकांत मोरे, तालुका युवा अध्यक्ष प्रसाद पाटील, सोशल मीडिया संयोजक मंगेश कदम, इत्यादीसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# कोंढाणे लेण्यांची पोलीस सुरक्षा परिषदेकडून स्वच्छता

**कर्जत : प्रतिनिधी**

कोंढाणे लेणीवर पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडियाच्या यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बुद्ध कालीन लेणी हे कर्जत तालुक्याचे आकर्षण असल्याने देशभरातील अभ्यासक या ठिकाणी लेणी पाहण्यासाठी येत असतात.

बुद्ध पौर्णिमा निमित्ताचे औचित्य साधून पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेचे वतीने कर्जत पासून काही अंतरावर असलेल्या बुध्द लेणी कोंढाणे लेणी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी तालुक्याच्या पदाधिकारी यांनी सहभाग घेऊन मोहीम यशस्वी केली. त्याचबरोबर पर्यटक यांना सहज सोप्या पद्धतीने लेणीपर्यंत जाता येईल या करिता संघटनेच्या माध्यमातून दिशा दाखवणारे फलक यांना पांढरा चुणा यांचा त्यावर लावण्यात आले. जेणेकरुन कोणी पर्यटकाची दिशाभुल होणार नाही. या वेळी लेणीच्या आतील बाजूचा व बाहेरील परिसर, पायऱ्या स्वच्छ करण्यात आल्या आणि तेथील महापुरुषांची प्रतिमा पाण्याने स्वच्छ करण्यात आले. त्या ठिकाणी राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत तब्बल २५ पिशव्या भरून प्लास्टिक आणि कचरा संकलित करण्यात आला.

यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष किशोर शितोळे, महाराष्ट्र प्रदेश कामिटी अध्यक्ष रतन लोंगले, प्रदेश कमिटी उत्तम ठोंबरे, कर्जत तालुका सचिव प्रफुल जाधव, सेल अध्यक्ष शांताराम मिरकुटे, सोनल जाधव, प्राची जाधव, सोनल भगत, सूरज चव्हाण, तेजस सोनवणे, हर्षद चौधरी आदी उपस्थित होते.



# कर्जतच्या ज्ञानदीप वसाहतीतील पूर नियंत्रणासाठी तात्पुरता उपाय

## दरवर्षी होतात शंभर कुटुंबे बाधित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत- पनवेल रेल्वे लाईन टाकल्यापासून ज्ञानदीप वसाहत परिसरातील शंभरच्यावर कुटुंबांना दर पावसाळ्यात जीव मुठीत धरून रहावे लागते. पावसाळ्यात तीन-चार वेळा पाणी येत असल्याने या परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होते. ही समस्या दूर करण्यासाठी संबंधित विभागांशी पत्रव्यवहार केला परंतु पावसाळा दीड महिन्यावर आला तरी ठोस उपाय योजना केली नसल्याने या परिसरातील पुराच्या पाण्याचा प्रश्न मध्य रेल्वे प्रशासनाने सोडविला नाही तर कर्जत रेल्वे स्थानकावर १५ जूननंतर कधीही रेलरोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गेल्या वर्षी आमदारांनी दिला होता. मात्र मध्य रेल्वेने तीन दिवस त्या परिसरातील पाणी लगेच निघून जावे याची तात्पुरती उपाय योजना केल्याने रेल रोको स्थगित करण्यात आला होता. यंदाही पूर नियंत्रित रहावा यासाठी तात्पुरता उपाय करण्यात आला आहे. कायमचा उपाय करण्यासाठी मध्य रेल्वे सुमारे ८२ लाख रुपये निधी खर्च येणार आहे.

कर्जत तालुक्यातील किरवली ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या ज्ञानदीप वसाहती मध्ये कर्जत-पनवेल रेल्वे लाईनमुळे नेहमीच पुराचे पाणी येते. गेली पंधरा सोळा वर्ष या पाण्याचा बंदोबस्त करावा म्हणून येथील रहिवासी मध्य रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करीत होते. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अखेर हा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी हाती घेतला आणि त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे विविध माध्यमातून पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात रेल्वे प्रशासनाचे संबंधित अधिकारी पाहणीसाठी आले. त्यावेळी तेथील रहिवाशांनी आपल्या समस्या मांडल्या. तरीही ठोस उपाय योजना होत नव्हती. नंतर ओसवाल यांनी पुन्हा पाठपुरावा सुरू केला आणि रेल्वे प्रशासनाने सभा आयोजित केली. रेल्वेचे अधिकारी अनिल हिवाळे यांनी रहिवाशांच्या समस्या समजावून घेण्यासाठी सभेत उपस्थिती दर्शविली होती.

> **पुराच्या पाण्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी त्या ठिकाणी 'कलवर्ट' बसविण्यात यावा. यासाठी मध्य रेल्वेने रेल्वे बोर्डाकडे तसा प्रस्ताव केला होता. रेल्वेने तात्पुरती उपाय योजना केल्याने या परिसरातील रहिवाशांना थोडा दिलासा मिळाला. यंदाही तोच उपाय करण्यात आला आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने उपाययोजना करण्यासाठी सुमारे ८२ लाख रुपये खर्च येणार आहे, मात्र काम होईपर्यंत याचा पाठपुरावा सुरूच राहील.**
>
> **-पंकज ओसवाल, सामाजिक कार्यकर्ता, कर्जत**

दीड वर्षांपूर्वी ज्ञानदीप वसाहतीतील महेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, पंकज ओसवाल, किरवलीचे सरपंच संतोष सांबरी, माजी उपसरपंच बिपीन बडेकर, पंकज पाटील, नगरसेवक संकेत भासे, अनिल व्हजगे, राहुल वैद्य, केतन बोराडे आदींसह रहिवासी उपस्थित होते. त्यानंतर डॉ. अपर्णा फडके आणि निखिल गवई यांनी दृक्श्राव्य पद्धतीने पूर परिस्थिती व त्यावर काय उपाय करायला हवेत? ते अगदी अभ्यासपूर्ण सादर केले होते.

या परिस्थितीची वेळो वेळी पाहणी करून यावर ठोस उपाय करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या आमदार महेंद्र थोरवे यांनी 'उगाचच वेळ न घालवता भविष्यात पूरपरिस्थिती निर्माण होणार नाही त्यासाठी रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर उपाय योजना करावी. अन्यथा आम्ही १५ जून नंतर कधीही रेल रोको करू असा इशारा दिला होता. हे 'जालीम औषध' योग्य ठरले आणि कर्जत रेल्वे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी यादव, रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी अनिल वर्मा आणि प्रकाश चौगुले यांनी तातडीने पी डब्लू आयचे शामू वर्मा, डिव्हिजनल ई ईस्टचे नरवडे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. त्यानंतर त्या परिसरतील वाहून जाणाऱ्या नाल्यांची दोन - तीन दिवस योग्य ती खोली व सफाई केली होती. यामुळे तेथील नागरिकांना सध्या तरी थोडा दिलासा मिळाला. आणि गेल्यावर्षी पुराचे पाणी वसाहतीत शिरले नाही. यंदा काहीतरी ठोस उपाययोजना करण्यात येईल असे वाटले होते.

# पेणमध्ये २० मे रोजी कव्वालीचा सामना

**पेण : प्रतिनिधी**

बहुजन विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पेणमधील गांधी मंदिर येथील पटांगणात प्रबोधनात्मक कव्वालीचा जंगी सामन्याचे आयोजन बहुजन विद्यार्थी संघटना तालुका व शहर पदधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी सकाळी १ वाजता बुद्ध पुजापाठ, दुपारी ४ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण कार्यक्रम, सायंकाळी ५ :३० वाजता विद्यार्थी गुणगौरव सोहळा व मान्यवरांचे सत्कार समारंभ तसेच रात्रौ ९ वाजता ख्यातनाम गायक (राघू फेम) राहुल शिंदे व पार्टी व ख्यातनाम गायिका सुहासिनी शिंदे आणि पार्टी यांचा कव्वालीच्या जंगी सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बहुजन विद्यार्थी संघटनेचे तालुकाध्यक्ष नागेश सुर्वे, शहर अध्यक्ष समिर घायतले, तालुका सचिव मनोज पाटील, तालुका संघटक विनोद जोशी आदींसह कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

# कृषी विभाग राज्यस्तरीय खरीप हंगाम पीक स्पर्धेचा निकाल जाहीर

## विजेत्या शेतकऱ्यांचे आयुक्त सुनील चव्हाण यांच्याकडून अभिनंदन

**पुणे : रामप्रहर वृत्त**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना पीक उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन त्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने राज्यात पीकस्पर्धा योजना राबविण्यात येते. त्यानुसार २०२२ मध्ये खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी,मका,नाचणी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या ११ पिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पीकस्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असल्याची माहिती कृषि आयुक्त सुनील चव्हाण यांनी दिली आहे. बक्षीसाचे स्वरुप प्रथम क्रमांक ५० हजार, द्वितीय ४० हजार तर तृतीय क्रमांक ३० हजार रुपये असे आहे. विविध गटातील प्रथम विजेते या राज्यस्तरीय खरीप पीकस्पर्धेत भात सर्वसाधारण गटामध्ये चांदखेड, जि. पुणे येथील शेतकरी नितीन चंद्रकांत गायकवाड यांनी राज्याच्या सरासरी उत्पादकतेच्या सहा पट अधिक उत्पादन घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. मराठवाड्यातील महिला शेतकरी श्रीमती जयश्री भीमराव डोणगापुरे यांनी तूर पिकात राज्याच्या सरासरी उत्पादकतेच्या चार पट अधिक उत्पादन मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर बोरपाडळे (कोल्हापूर) येथील बाजीराव सखाराम खामकर यांनी सोयाबीन सर्वसाधारण गटात राज्याच्या सरासरी उत्पादकतेच्या सहा पट अधिक उत्पादन मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. बाजरी पिकात सांगली जिल्ह्यातील विठ्ठल ईश्वर सावंत यांनी तर नाचणी पिकात कोल्हापूर जिल्ह्यातील शिवलिंग कल्लाप्पा गावडे, मूग पिकासाठी अहमदनगर जिल्ह्यातील सुभाष बाजीराव कर्डिले, उडीद पिकासाठी दिपक तुकाराम ढगे तसेच भूईमुग पिकासाठी कृष्णा भाऊ चौगुले व सुर्यफूल पिकाच्या उत्पादन वाढीसाठी सोलापूर जिल्ह्यातील सोपान कृष्णा कारंडे हे प्रथम क्रमांक विजेते ठरले आहेत.

हरपळवाडी (सातारा) येथील शेतकरी प्रल्हा्द नारायण काळभोर यांनी ज्वारी पिकात तर अग्रण धुळगावचे (सांगली) संभाजी तातोबा खंडागळे यांनी मका पिकात राज्याच्या सरासरी उत्पादकतेच्या सात पट अधिक उत्पादन मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. नांदेडच्या श्रीमती वनिता श्रीराम फोले यांनी सोयाबीन आदिवासी गटात विक्रमी उत्पादन मिळवून प्रथम मिळविला आहे.

**द्वितीय व तृतीय विजेते**

भात पीकस्पर्धेत सर्वसाधारण गटात कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णात गोपाळ खाडे व बाबूराव आप्पाजी परीट तर आदिवासी गटात पुणे जिल्ह्यातील मुरलीधर सखराम कवठे व शांताराम तुकाराम बोकड. खरीप ज्वारी सर्वसाधारण गटात जळगाव जिल्ह्यातील ज्ञानेश्वर चिंतामण पाटील व अर्जून दामू पाटील तर आदिवासी गटात धुळे जिल्ह्यातील बिलाड्या चमाऱ्या पावरा व सुकमाबाई खुमसिंग पावरा. खरीप बाजरी सर्वसाधारण गटात सांगली जिल्ह्यातील विठ्ठल बापू चोपडे आणि नामदेव चनबसू माळी, तर आदिवासी गटात धुळे जिल्ह्यातील जगदीश हारु पावरा व वामन लालसिंग पावरा.

मका सर्वसाधारण गटात सुमंत तुळशराम पवार आणि भिमराव राजाराम खर्चे, तर आदिवासी गटात गंगराम वेस्ता पावरा आणि रणजित गणा पावरा.

नाचणी सर्वसाधारण गटात कोल्हापूर जिल्ह्यातील बाळू लक्ष्मण भडगावकर व विष्णू धोंडिबा गावडे, तर आदिवासी गटात ठाणे जिल्ह्यातील मुसईवाडी येथील जानु ओको कामडी व पद्माकर महादु वाख.

तूर सर्वसाधारण गटात अहमदनगर जिल्ह्यातील विक्रम पंढरीनाथ अकोलकर व श्रीमती बाई बुवासाहेब शिंदे, तर आदिवासी गटात दिलीप चामट्या भिल.

मूग सर्वसाधारण गटात अहमदनगर जिल्ह्यातील गोरख हरीभाऊ जाधव, धोंडीभाऊ मारुती जरे, तर आदिवासी गटात शांताबाई पंडित चौधरी व प्रकाश हेमकांत बंकाळ.

उडीद पीकासाठी सर्वसाधारण गटात नितीन सुर्यकांत शेटे आणि भागचंद्र शाहूराव उगले, तर आदिवासी गटात सखाराम कैस गावित.

सोयाबीन पिकासाठी सर्वसाधारण गटात राजाराम योगाजी शिंदे व रमेश विलास जाधव, तर आदिवासी गटात नारायण मल्हारी तुगार व रेखा रमेश कुमरे.

भुईमुग सर्वसाधारण गटात रामचंद्र विठू कोरे आणि सावित्रीबाई रामचंद्र पाटील. सुर्यफूल सर्वसाधारण गटात विश्वनाथ भिमराव पाटील व भारत लक्ष्मण मुंगसे यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला आहे.

पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन पीकस्पर्धेत सहभाग घेण्यासाठी सर्वसाधारण व आदिवासी गटास पीकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. ३०० प्रवेश शुल्क आहे. यापुढील स्पर्धे साठीही इच्छुक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन कृषि आयुक्त चव्हाण यांनी केले आहे.

# माथेरानमधील ४६० घोड्यांच्या पासिंगसाठी पोलिसांना निवेदन



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी मार्च ते एप्रिल महिन्यात माथेरान मधील प्रवासी वाहतूक करणाऱ्या घोड्यांची पासिंग पोलीस ठाणे माथेरान याठिकाणी केली जाते. परंतु यावर्षी मे महिना उलटून जात असताना सुध्दा अद्यापही याबाबत संबंधीत खात्याने काही उपाययोजना न केल्यामुळे येथील अश्वपाल तथा माथेरानचे स्वच्छता दूत राकेश कोकळे यांनी कर्जत येथे प्रत्यक्ष जाऊन उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत (रायगड) यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

आजवर राकेश कोकळे यांनी संघटनेसाठी आपल्या परीने अनेक महत्वाची कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केलेले असून एक स्वच्छता दूत म्हणून त्यांची ओळख आहे. लवकरच सर्व ४६० प्रवासी वाहतूक करणाऱ्या घोड्यांची पासिंग घेतली जाण्याची शक्यता राकेश कोकळे यांच्या निवेदनावरून निर्माण झाली आहे.

# ४० पर्यटकांनी भरलेली बोट उलटली

## २२ जणांनी गमावला जीव



**मलप्पूरम : वृत्तसंस्था**

उन्हाळ्याच्या सुट्टया असल्याने किंवा लाँग विकेण्ड पकडून अनेक जण केरळमध्ये फिरायला गेले होते, मात्र या वेळी एक मोठी दुर्घटना घडली. पर्यटकांनी भरलेली नाव उलटून यामध्ये २२ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

केरळमधील मलप्पूरम जिल्ह्यातील तनूरजवळ पर्यटकांची बोट उलटून आतापर्यंत २२ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन सकाळी तनूर दुर्घटनास्थळी भेट देणार आहेत. मुख्यमंत्र्यांचे आज होणारे राज्यातील सर्व शासकीय विभागांचे अधिकृत कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.

राज्यमंत्री व्ही अब्दुरहमान यांनी माहिती दिली की, केरळमधील मलप्पुरम जिल्ह्यात मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा अपघात रात्री उशिरा झाला.

# माणगावमध्ये आजपासून महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

महिला मुलींचे सबलीकरण व्हावे, संकटसमयी महिलांनी स्वसंरक्षण करावे व आत्मनिर्भर व्हावे या उद्देशाने दुर्गवीर प्रतिष्ठान व फिनिक्स इनोवेव्टिव्ह हेल्थकेअर मेन्यूफ्रॅक्चरर्स प्रा. लि. यांच्या वतीने माणगाव येथे ९ ते १४ मे रोजी सकाळी ८ ते १०:३० व सायंकाळी ४ ते ६:३० या वेळेत १० वर्षांवरील मुली, महीला करिता स्वसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात भारतीय व्यायाम, दंड, सूर्यनमस्कार, लाठी, भाला, नियुद्ध, भारतीय युद्धशास्त्र इतिहास,शिवकालीन शस्त्रास्त्रे या विषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रथम नाव नोंदणी करणाऱ्या ३० मुली, महिलांना या शिबिरात प्रवेश दिला जाणार आहे.

# संशयावरून प्रेयसीवर चाकूने हल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रेयसी फसवत असल्याच्या संशयावरून ३० वर्षीय तरूणाने तिच्यावर चाकूने हल्ला केल्याचा गंभीर प्रकार सांताक्रुझ पूर्व येथे घडला. यावेळी आरोपीने तिच्या मित्रावरही हल्ला केला. दोघांनाही व्ही.एन. देसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरूणी उर्वी रावल (३१) ही कार्यक्रम आयोजन क्षेत्रात काम करते. तिचा मित्र फराज अन्सारी (३५) याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी ती गेली होती. यावेळी अन्सारीची मैत्रीण शाझिया खान (तक्रारदार), रावल आणि तिचा मित्र रिफाकत वडगामा आणि इतर उपस्थित होते.

शनिवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास अन्सारी याचा वाढदिवस साजरा केल्यानंतर रावल व इतर मंडळी होलीक्रॉस कम्युनिटीजवळ फिरण्यासाठी आले होते. त्यावेळी मुंब्रा येथे राहणारा रावलचा प्रियकर समीर शेख तेथे आला.

शेखने रावलला मारहाण केली, तिचा फोन हिसकावून घेतला आणि वडगामाकडे बोट दाखवत तो कोण आहे, असे विचारले. रावलने त्याला उत्तर देत वडगामा तिचा मित्र असल्याचे सांगितले. यानंतर शेखने तिला शिवीगाळ केली, चाकू काढला आणि रावलवर हल्ला केला. वडगामाने तिला वाचवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा शेखनेही त्याच्यावर हल्ला केला. नंतर शेख घटनास्थळावरून पळून गेला, असे शाझिया खानने तक्रारीत म्हटले आहे.

शाझिया आणि तिच्या इतर मित्रांनी जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. शाजियाच्या तक्रारीवरून वाकोला पोलिसांनी समीर शेखविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे. रावल दुसऱ्या तरूणाला भेटते, या संशयावरून गेल्या दोन महिन्यांपासून आरोपी शेख तिच्याशी भांडत होता, असे रावलने सांगितल्याचे शाझियाने तक्रारीत म्हटले आहे.


## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२३ ते २०२८ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे १. पुष्पनारायण कॉम्पलेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मु.देवद, ता. पनवेल, जि.रायगड. २. भारत इलेक्ट्रानिक्स कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १०/०५/२०२३ ते १६/०५/२०२३, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १७/०५/२०२३, नामनिर्देशन पत्र माघारी दि. १८/०५/२०२३ ते ०१/०६/२०२३ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक ११/०६/२०२३, व दि. ०९/०६/२०२३ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती संस्थेचे कार्यालयांत व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(निता पुगांवकर)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

**सही/-**
**(विजय सडके)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# खारघर-तुर्भे लिंक रोड साकारणार

## पुढील तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सायन-पनवेल महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी खारघर-तुर्भे लिंक रोड प्रस्ताव एमएसआरडीसीने तयार केला आहे. या प्रकल्पासाठी २,१९५ कोटी खर्च येणार असून या लिंक रोडमुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील वाहनचालकांना सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे-बेलापूरऐवजी खारघरमार्गे प्रवास करता येणार असल्याने वेळेची बचत होणार आहे.

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर हा नवी मुंबईचा लौकिक वृद्धिंगत होण्यासाठी सिडको सातत्याने प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणून तुर्भे-खारघर लिंक रोडमुळे शहरातील दळणवळणाच्या सुविधांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न आहे.**

**-डॉ. संजय मुखर्जी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सायन-पनवेल या महामार्गावर अपघातांचे प्रमाण जास्त आहे. यात दुचाकीचालकांचे बळी जाण्याची घटना अधिक असल्याने या मार्गावरील वाहतूक काही प्रमाणात वळवण्यात यावी म्हणून रस्ते विकास महामंडळाने तुर्भे औद्योगिक वसाहत ते खारघर हा सहा किलोमीटर लांबीचा पारसिक डोंगरातून लिंक रोड तयार करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. हा लिंक रोड खारघरमधील सिडकोच्या कॉर्पोरेट पार्कला जोडण्यात येणार आहे.

सहा किलोमीटर लांबीच्या या लिंक रोडसाठी २,१९५ कोटी खर्च केले जाणार आहेत. यासाठी सिडकोने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दोन कोटींच्या निधीची तरतूद केली असून पुढील तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.



### शहराच्या विकासाला चालना

**बेलापूर ते पेंधर मेट्रो सुरू होणार आहे. अशातच तुर्भे-खारघर भुयारी मार्गाचे काम सुरू झाल्यास खारघर आणि तळोजा परिसरातील नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे. या प्रकल्पामुळे खारघर, तळोजा परिसरातील घरांना अधिक मागणी येणार असल्याचे बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे आहे; तर खारघर-तुर्भे लिंक रोड होणार असल्यामुळे खारघर परिसरात काही बाहेरील देशांतील शैक्षणिक संस्थांनी जागा घेतल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने खारघर शहराचा विकास अधिक झपाट्याने होणार आहे.**

### आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी उपयुक्त

**जुईनगर स्थानकासमोरील हार्डेलिया कंपनीकडून खारघर टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्याला लागून हा प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे सिडकोच्या खारघरमधील सेंट्रल पार्क, गोल्फ कोर्स आणि फुटबॉल मैदानाचे महत्त्व वाढणार आहे. तसेच नवी मुंबईला थेट जगाशी जोडणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठीदेखील हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.**

## कळंबोलीत एकाची निर्घृण हत्या; परिसरात खळबळ

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीमध्ये एका व्यक्तीची अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने सेक्टर ४ मधील उद्यानात सोमवारी (दि. ८) पहाटेच्या सुमारास हत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मयत व्यक्तीचे नाव यशपाल सिंग खोसा (वय ४१) असे असून ते सोमवारी नेहमीप्रमाणे आपल्या श्वानास घेऊन साईनगर वसाहतीसमोरील उद्यानात फेर फटका मारण्यास गेले होते. याचवेळी अज्ञात व्यक्तींनी त्याच्या राहत्या घराबाहेरील सेक्टर ४ मधील उद्यानात धारदार शस्त्राने हत्या केली. पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे व कळंबोली पोलिसांचे पथक यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. त्यानंतर त्यांनी परिसरातील सर्व पोलीस ठाण्यातील गुन्हे विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण केले.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मुळे लवकरच या गुन्हाचा छडा लावू, हत्येचे नेमके कारण समजले नसले तरी पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली.

## कामगाराचा ४० फुटांवरून पडून मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

सोलर फिटिंगचे काम करीत असताना ४० फुटांवरून खाली पडून एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये घडली आहे. याप्रकरणी संबंधित कॉन्ट्रॅक्टर आणि कंपनी मालक यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नं. एल / १०६, रत्नेश इंजिनियरिंग प्रा. लिमी येथे ४० फूट उंचीवरील पत्र्यावर सोलर फिटिंगची कामे करीत असतांना तेथील कामगारांच्या सुरक्षिततेची काळजी न घेता कामगारांना कोणतेही सुरक्षिततेची साधने न पुरवल्याने तेथे काम करणारा कामगार शुभम देडे (वय ३०) हा सहकाऱ्यांसह ४० फूट उंचीवर काम करीत होता. या वेळी त्याचा पत्र्यावरून तोल जाऊन तो खाली पडून त्यात तो गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू पावल्याने संबंधित कॉन्ट्रॅक्टर आणि कंपनी मालक यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पेंधर येथे मारहाणप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून दोघांनी एका व्यक्तीला मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना पनवेल तालुक्यातील पेंधर गावात घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादी कमलेश लालबाबू सिंह (वय ४१, रा. पेंधर, मुळ गाव बिहार) यांचा बिहार येथील आपल्या मूळगावी आरोपी पप्पुकुमार रामअवदेश सिंह (वय ३०), देवकुमार रामकेश्वर सिंह (वय ३२) यांच्यासोबत भांडण झाले होते. याचा राग मनात धरून दोघांनी कमलेश सिंह याला लाकडी दांडक्याने व हाताचापटाने मारहाण करुन शिवीगाळी केली तसेच तुला इथे राहून देणार नाही, अशी धमकी दिली. या मारहाणीत कमलेश याच्या डोक्यात डाव्या बाजुला मारुन तो जखमी झाला आहे.

याप्रकरणी तळोजा पोलिसांनी या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह चव्हाण करीत आहेत.

## पनवेल तक्का येथे मृतदेह आढळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील तक्का येथील पनवेल वॉईन शॉपचे शेजारी फुटपाथवर एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात अली असून या मयताच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्ष असून त्याची उंची अंदाजे पाच फुट सहा इंच, वर्ण सावळा, बांधा सडपातळ, डोक्याचे केस पांढरे व वाढलेले, दाढी व मिशी वाढलेली व पांढरी, चेहरा उभट आहे. त्याने अंगात तांबूस व काळे टिपके असलेला फुल बाह्यांचा मळलेला शर्ट व निळी मळकट फुल पॅट घातलेली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक निरीक्षक स्वप्नील केदार (९७६६४५४२४५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



पनवेल : तालुक्यातील नेवाळी येथे विश्वास आत्माराम काथारा यांनी 'बापू चा ढाबा' नव्याने सुरू केला आहे. या ढाब्याचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले तसेच या ढाब्याला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. दोघांनीही विश्वास काथारा यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, गोपीनाथ काथारा, सुभाष काथारा, देवनाथ काथारा, सचिन काथारा, उदय काथारा, अनंता काथारा, पंडीत भोईर, शिवनाथ गायकवाड, शंकर काथारा, विजय काथारा, लहु गडगे, किशोर काथारा, अंकुश पाटील, कैलास पाटील, एम. डी. गडगे, निलेश काथारा, अंश पाटील, महादेव गडगे आदी उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दुल)

## घोटगाव येथून मुलासह विवाहिता बेपत्ता; तक्रार दाखल

**पनवेल : वार्ताहर**

आपल्या चार वर्षीय मुलासह २४ वर्षीय विवाहित महिला घोटगाव सुपरमार्केट येथील राहत्या घरातून कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेली. ते दोघे हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

माया चंद्रजित प्रजापती असे या महिलेचे नाव असून ती चार वर्षीय मुलगा विक्रम याच्यासोबत निघून गेली आहे. माया प्रजापतीची उंची पाच फूट असून बांधा सडपातळ, चेहरा गोल, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक-सरळ असे तिचे वर्णन आहे तसेच तिने जांभळ्या रंगाचा टॉप, काळ्या रंगाची लेगीज घातलेली आहे. तिला मराठी, हिंदी भाषा बोलता येते, तर मुलगा विक्रम सडपातळ असून त्याचा चेहरा गोल, रंग गोरा, केस काळे आहे. या दोघांबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा उपनिरीक्षक प्रतापसिंह चव्हाण (९६८९४७२६४६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



## श्री विरुपाक्ष महादेव मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

### तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधील जागृत देवस्थान श्री विरुपाक्ष महादेव मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा तीन दिवस मोठ्या उत्साहात झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही सेवा समूहाच्या साथीने विविध प्रकारचे होम हवन व सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे देवस्थानाचा २० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त रविवारी मंदिरात सकाळपासून पुण्याहवाचन, प्रासाद वास्तू मंडल, मुख्यदेवता मंडल, ग्रहमंडल देवता पूजन व हवन मंदिरातील सर्व देवतांना प्रोक्षण विधी व अभिषेक पूजा तर संध्याकाळी दिपोत्सव साजरा करण्यात आला. तर सोमवारी श्री विरुपाक्ष महादेवाला कुंभाभिषेक करण्यात आला. त्यानंतर प्रत्येक देवाला आंबा फळाचे अर्चन करण्यात आली व सहस्र आंब्यांचे अर्चन श्री. विरूपाक्ष महादेवांना करण्यात आली. तसेच श्री. विरूपाक्ष महादेव, श्री. पार्वती माता आणि मंदिराचे शिखरावरील कळस यांना ८१ कुंभातील द्रव्याने स्नपन विधी झाला.

यानतर आरती, मराठी भक्तीगीत, भावगीत, नाट्यगीत यांचा सूर निरागस हो हा बहारदार कार्यक्रम झाला. या वेळी आपल्या सुरेल गायनाने गायकांनी उपस्थितांची मने जिंकली.

## दांड फाटा येथे एसटी प्रवाशांची गैरसोय

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रसायनी पाताळगंगा परिसरातील घाटमाथ्यावर जाणाऱ्या प्रवाशांसाठी मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दांडफाटा येथे एसटी महामंडळाने लांब पल्ल्याच्या बसला थांबा दिला आहे, मात्र तरीही काही बस याठिकाणी थांबत नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते.

शाळांना उन्हाळ्याची सुटी, त्यात लग्नसराईचे दिवस असल्याने गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांची वर्दळ असते. बस थांबली नाही, तर मनस्ताप सहन करावा लागत असल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त करत आहेत. रसायनीत तसेच पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठी आहे. जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर दांड फाटा येथे अति जलद वगळता सर्वसाधारण एसटी थांबा आहे, मात्र काही वाहक त्याची अंमलबजावणी करीत नसल्याने प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो.

या ठिकाणी वाहतूक नियंत्रक नेमवा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## उरणमध्ये रस्ता बंद असल्याने दुचाकीचालकांचा धोकादायक प्रवास



**उरण : रामप्रहर वृत्त**

फुंडे, डोंगरी व पाणजे या तीन गावांना जोडणारा जुना शेवा फाटा ते फुंडेदरम्यानच्या रस्त्यावर मातीचा डंपर टाकून रविवारी बंद केला आहे. मात्र तरीही दुचाकीचालक धोकादायक प्रवास करीत आहेत, तर हा रस्ता बंद झाल्याने नागरिकांना लांबचा प्रवास करावा लागत आहे.

उरण तालुक्यातील फुंडे, डोंगरी व पाणजे या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील सिडकोचा खाडीपूल २०२१मध्ये कोसळला आहे. यामध्ये एका तरुणाचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर उरणमधील सर्व खाडीपुलांची तपासणी करण्यात आली. यामध्ये उरण-पनवेल मार्गावरील खाडीपूल ही कमकुवत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे एसटी व एनएमएमटी बसेस बंद करण्यात आली आहेत.

परिणामी फुंडे, डोंगरी, पाणजे व बोकडवीरा या चार गावातील नागरीकांना सहा किलोमीटर दूर अंतरावर बससाठी जावे लागत आहे. या पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे, तर दुसरीकडे उरण ते फुंडे जुना मार्गही बंद होता. त्याची दुरुस्ती करून सुरू करण्यात आला. त्यामुळे येथील प्रवाशांना दिलासा मिळाला होता, मात्र कमकुवत असलेल्या या मार्गावरून जड डंपर ये-जा करू लागले आहेत. त्यामुळे रस्त्यावरील मोरी पुन्हा नादुरुस्त होण्याची शक्यता वाढली असल्यामुळे बंदी घालण्यात आली होती. तरीही जड वाहने ये-जा करीत असल्याने हा मार्ग बंद करण्यात आला आहे. यानंतर दुचाकीस्वार येथून धोकादायकरित्या प्रवास करीत आहेत.

## पनवेलमध्ये विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी समुपदेशन मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशन मेळाव्याचे आयोजन गुरुवारी (दि. ११) रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते समुपदेशन मेळाव्याचे उद्घाटन करण्याचे आदेशित केले आहे.

त्यानुसार इयत्ता दहावी अथवा बारावी नंतरचे महाविद्यायालयीन शिक्षण व अभ्यासक्रम, महाविद्यायालयीन अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया, कलमापन चाचणी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना व कर्ज योजना यांची माहिती, भविष्यातील रोजगाराच्या संधी, व्यक्तिमत्व विकास, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण या विषयाची माहिती होण्याकरिता इयत्ता दहावी अथवा बारावीच्या परिक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे समुपदेशन मेळावा आयोजित केला आहे. त्यामध्ये वरील विषयावर नामांकित वक्त्याकडून समुपदेशन करण्यात येणार आहे.

तरी या मेळाव्यास जास्तीत जास्त संख्येने रायगड जिल्हातील विद्यार्थी व पालक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य नि. के. चौधरी यांनी केले आहे.

## पनवेल आयटीआयमध्ये उपहारगृहासाठी निविदा प्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी, कर्मचाऱ्यांसाठी जेवण व अल्पोपहार मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी उपहारगृह सुरू करण्याकरिता शासनाने आवाहन केले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल या शासकीय शैक्षणिक संस्थेच्या आवारात एकूण पाच इमारती असून दीड हजारापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना येथे व्यवसाय शिक्षण दिले जाते. त्याकरिता उपलब्ध असलेला शिक्षक अथवा शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग जवळपास २०० च्या आसपास आहे. या प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जेवण व अल्पोपहार तसेच इतर खाद्य पदार्थ स्वच्छ व स्वस्त दरात संस्थेच्या आवारात उपलब्ध करून दयायचे असल्याने शासनाने घालून दिलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून महिला गटाच्या आहार व्यवस्थापक ठेकेदारास ज्यांना महाराष्ट्रीयन पध्दतीचे जेवण, अल्पोपहार, चहा,



कॉफी इ. खाद्य पदार्थ उत्तमरित्या पुरविण्याचे व शासकीय खाजगी उपहारगृह अथवा फिरते उपहारगृह (मोबाईल कॅन्टीन) चालविण्याचा अनुभव आहे. त्यांच्याकरिता संबंधित अटी व शर्ती, निविदा सूचना, विहित निविदा नमुना व महत्वाच्या इतर सूचना या संस्थेत उपलब्ध करण्यात आलेल्या असून त्याच्या छापील प्रतींची किंमत २०० रुपये अशी आहे.

निविदे प्रक्रियेबद्दल अन्य काही महत्वाच्या अटी-करारपत्र ११ महिन्यांकरिता (Leave Licence) पध्दतीने करण्यात येईल, करारनामा हा (Legal vetted) कायदेशीर असेल, जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होईल त्या दरानुसार आकारण्यात येईल, वीज देयक अथवा पाणी देयक स्वतंत्ररित्या आकारण्यात येईल.

इच्छुकांनी आपल्या सिलबंद निविदा विहित नमुन्यात १९ मे २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत या संस्थेत सादर कराव्यात, असे आवाहन पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य नि. के. चौधरी यांनी केले आहे.

संपादकीय

# कर्नाटकी धुमशान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकातील जाहीरसभांमध्ये काँग्रेसची अक्षरश: लक्तरे काढली. मतदानयंत्राचे बटण दाबताना 'बजरंग बली की जय' असे म्हणूनच बटण दाबा आणि जातीय राजकारण करणाऱ्यांना धडा शिकवा असे त्यांनी सांगून टाकले. तर पंतप्रधान मोदींना वैयक्तिक शिव्यांची लाखोली वाहण्याचा विक्रम काँग्रेसने केला. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कर्नाटकात नेहमीच किंगमेकरची भूमिका वठवू पाहणाऱ्या तथाकथित धर्मनिरपेक्ष जनता दलाची अत्यल्प उपस्थिती. अर्थात त्याचा भाजपला फायदाच होईल असे दिसते.

**गेले महिनाभर शेजारच्या कर्नाटकामध्ये निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू होती, ती सोमवारी संपली. भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या दोन पक्षातच येथे जोरदार लढत आहे हे स्पष्ट दिसतेच. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आपली संपूर्ण ताकद प्रचारात झोकून दिली होती. तशी काँग्रेसनेही पूर्ण ताकदीनिशी लढाईची तयारी केली होती. त्यामुळे प्रचार अटीतटीचा होणे स्वाभाविकच होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी स्वत: लक्ष घालून प्रचाराची सूत्रे सांभाळली. तसेच काँग्रेसनेही माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांच्यापासून आजी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यापर्यंत प्रचंड मोठा फौजफाटा निवडणुकीच्या रिंगणात उतरवला. काँग्रेसचे कर्नाटकातील प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी 'जिंकू किंवा मरू' या थाटातच स्वत:ला प्रचारात झोकून दिले होते. साम-दाम-दंडभेदाचे सर्व प्रकार शिवकुमार यांनी वापरून पाहिले. नेमका कोणावर विश्वास ठेवायचा हे आता कर्नाटकी मतदारांवर अवलंबून आहे. कर्नाटकामध्ये दर पाच वर्षांनी सरकारात बदल होतो. एकाच पक्षाचे सरकार सलग दुसऱ्यांदा निवडून देण्याचा कर्नाटकी जनतेचा शिरस्ता नाही. त्यादृष्टीने पाहू गेल्यास सत्ताधारी भारतीय जनता पक्षासमोर मोठेच आव्हान उभे आहे, असे म्हणावे लागेल. विविध संस्थांद्वारे आणि वृत्तवाहिन्यांमार्फत झालेल्या जनमतचाचण्यांमधून भाजपची पीछेहाट होणार असेच भाकीत आकडेवारीनिशी केले गेले. सर्वार्थाने यंदा काँग्रेसचे पारडे जड असल्याचे समाजमाध्यमांवरील चर्चेत दिसून येत आहे. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात काँग्रेसने काही प्रमाणात आघाडी घेतली होती. मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यावर काँग्रेसने बेछूट आरोप केले होते, परंतु काँग्रेसने प्रकाशित केलेल्या पक्षाच्या जाहिरनाम्यानंतर मात्र सारे चित्र वेगाने बदलले. भाजपने आपल्या जाहिरनाम्यात समान नागरी कायदा लागू करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यात काही नवीन असे नाही. समान नागरी कायदा हा भाजपच्या मूळ कार्यक्रमाचाच एक भाग आहे. याउलट काँग्रेसच्या जाहिरनाम्यात मात्र बजरंग दलावर बंदी आणण्याचे आश्वासन देण्यात आले. पीएफआय या संघटनेवर निर्बंध आणल्याचा सूड म्हणून काँग्रेसतर्फे बजरंग दलावर बंदी आणण्याची भाषा केली गेली हे उघड आहे. या मुद्यावर प्रचंड गदारोळ झाला. इतके पराभव पदरी पडूनही काँग्रेसला लांगुलचालनाचा मोह सुटत नाही हे पाहून कर्नाटकातील मतदार संतापले यात नवल नाही. येत्या १० तारखेला म्हणजेच बुधवारी कर्नाटकातील मतदान पार पडेल आणि १३ तारखेला म्हणजेच शनिवारी मतदारांचा कौल कळेल. तोपर्यंत साऱ्यांचे लक्ष कर्नाटककडे लागून राहिलेले असेल यात शंका नाही. कारण लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांना वर्षभरातच सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांसाठी कर्नाटकातील मतांची गणिते फार महत्त्वाची आहेत.**

# जलस्त्रोत आटल्याने महाडमध्ये पाणीटंचाई

खबरबात
महेश शिंदे

महाड तालुक्यात गेली कांही दिवसात पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आटू लागले आहेत. ज्या ठिकाणी बोअरवेल, विहिरी आहेत त्यांची पाण्याची पातळीदेखील झपाट्याने घटली आहे. यामुळे महाड तालुक्यातील टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. सध्या जवळपास ८८ वाड्या आणि सात गावांमधून पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. शासनाने पावसाळ्यापूर्वी राबवलेल्या जलजीवन सारख्या योजना सपशेल फेल गेल्याचे चित्र दिसू लागले आहे. पाणी टंचाई मुळे शहरातील चाकरमनी गावाकडे येण्यास उत्सुक नसल्याने अनेक गावात शुकशुकाटदेखील आहे.



मोठ्या प्रमाणात पाऊस व पूरपरिस्थिती पावसाळ्यात निर्माण होत असतानाही अनेक गावांना उन्हाळ्यात पाणी पाणी करावे लागत आहे. तालुक्यात गतवर्षीही समाधानकारक पाऊस झाला असला तरीही सातत्याने पाणी टंचाई जाणवत आहे. पाणी योजना राबवताना योग्य नियोजन केले जात नसल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. सन २०१९ मध्ये टंचाई आराखड्यात ५४ गावे व १८४ वाड्यांचा समावेश होता. गेल्या वर्षी १२ गावे, ८२ वाड्यांना नऊ टँकरने पाणीपुरवठा करावा लागला होता. यावर्षी ८८ वाड्या आणि सात गावांमधून टंचाई जाणवू लागली आहे. यावर्षी वाढलेल्या तापमानामुळे नद्या, नाले, विहिरी, विंधन विहीरी हे पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत एप्रिल मध्येच आटल्याने तालुक्यात पाणीटंचाई जाणवू लागली आहे. महाड तालुक्यात १८५ नळपाणी पुरवठा योजना आहेत, परंतु पाण्याचे स्त्रोत संपल्याने या पाणी पुरवठा योजना ठप्प झाल्या आहेत. नद्या नाले आटल्याने गुरांना लागणाऱ्या पाण्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. दुर्गम भागात पाण्याचे अन्य स्त्रोत उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. यावर्षी जलजीवन योजना राबवल्या जात आहेत मात्र या योजना राबवतानादेखील ठेकेदार आपला स्वार्थ साधत असल्याने ग्रामीण भागात या योजना फेल ठरत आहेत.



सद्या महाड तालुक्यात पिंपळकोंड, सोपे अथवा गोवेले, शेवते, भोगाव, आढी, वीर या सात गावांमधून तर निगडे गावाच्या खोतवाडी, मोरेवाडी, उतेकरवाडी, फणसेवाडी, जगतापवाडी, कदमवाडी, नातोंडी मारुती वाडी, बौद्धवाडी, सोनारवाडी, बुरुडवाडी, मोहल्ला, रेवतळे, रेवतळे फौजदार कोंड, चोचिंदे गौळवाडी, कुंभार्डे धनगरवाडी, फौजी अंबावडे जंगमधार, करंजाडी म्हस्केकोंड, ताम्हाणे धनगरवाडी, कावळे धनगरवाडी, तळीये मधली वाडी, बौधवाडी, चर्मकार वाडी, कुंभेनळी, खालची वाडी, आदिवासी वाडी, पांगारी धार, वाकी बुद्रुक बौद्धवाडी, गावठाण, नारायणवाडी, धनगरवाडी, शेवते आंब्याचा मळा, रोहिदास वाडी नानेमाची, पेढामकरवाडी, भोगाव आदिवासी वाडी, सुखदरे कोंड, देऊळ कोंड, बौद्धवाडी आडी, आडी बौद्धवाडी, दत्तवाडी, दाभोळ दाभोळ खलाटवाडी, पुनाडे गाव, कुंभे शिवथर, सुनेभाऊ, चेराववाडी, रावतळी मानेचाधार, सुतारआळी, बौद्धवाडी, मावळती कोंड, झटाम मोहल्ला, मधली वाडी, उगवती वाडी, मधली वाडी, इसाने मोहल्ला, मोहोत वडघर भिवघर आदिवासी वाडी, दहिवड आदिवासी वाडी, जिते तेरडेवाडी, मोहोत कातिवडे, बोरगाव, वीर भवानीनगर, मोहल्ला, खडकवाडी, टेंबे आदिवासी वाडी, दत्तवाडी, गणेशवाडी, घोलेवाडी, ताम्हाने बौद्धवाडी, दळवीवाडी, बद्रिकेवाडी, दाभेकर वाडी, मोहितेवाडी, धुमाळवाडी, जोगळेवाडी, पवारवाडी, खामकर कोंड, दासगाव भोईवाडी, आदिवासी वाडी, जाधव वाडी, गणेश नगर, बौद्धवाडी, चर्मकार वाडी, पाटील आळी, न्हावी कोंड, पेटकर आळी, नगरभवन, वाळसुरे दत्तवाडी, याचबरोबर पिंपळकोंड, पाचाड गाव व वाड्या, पुनाडे, सापे, साकडी, नेराव, या वाड्यांना देखील टंचाईची झळ पोहचत आहे. या ठिकाणी टँकर पाणीपुरवठा हाच आधार उरला आहे. पाण्याचा टँकर हा दररोज जात नसल्याने पाणी पुरवून वापरावे लागत असते.

उन्हाळ्याच्या सुटीचे दिवस असल्याने अनेक गावांमध्ये मुंबई, सुरत, पुण्याकडील चाकरमानी राहण्यासाठी येत असतात. मात्र वाढते तापमान आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे गावाकडे येण्यास चाकरमनी उत्सुक नाहीत. केवळ लग्नसराई असल्याने एखाद्या लग्न सोहळ्यास भेट देवून चाकरमनी पुन्हा परतीच्या प्रवास धरत आहेत. पाणीटंचाईमुळे गुराढोरांना दूरवर डबक्यात साठलेले पाणी पाजण्यासाठी न्यावे लागते. तर महिलावर्गही कपडे धुण्यासाठी अशाच नदीत साठलेल्या पाण्याचा वापर करत असल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे. दुर्गम भागात असलेल्या आदिवासी व धनगरवाड्यांना या टंचाईचा मोठा फटका जाणवत आहे. कावळे धनगरवाडी, गोंडाळे आदिवासीवाडी, आढी गौळवाडी, पारवाडीच्या आदिवासीवाड्या, वीर खरबकोंड अशा वाड्यांत ग्रामस्थांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# नोकियाचा 'हा' स्मार्टफोन पाण्यातही चालणार!




मोबाईल फोन जगतात नोकिया कंपनीने एकेकाळी मोठी उलाढाल केली होती, गेल्या काही महिन्यांपासून स्मार्टफोन जगतात Nokia पाठिमागे पडल्याचे दिसत होते. पण, आता पुन्हा एकदा Nokia कंपनीने स्मार्टफोन जगतात मोठं पाऊलं ठेवलं आहे. आता नवे मॉडेल्स कंपनीने बाजारात लाँच केले आहेत. कंपनीने HMD Global ने Nokia XR21 नावाचा शक्तिशाली स्मार्टफोन जागतिक बाजारपेठेत सादर केला आहे. हा नवीन फोन क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ६९५ चिपसेटद्वारे समर्थित आहे आणि यात 64MP प्राथमिक कॅमेरा आहे.

याशिवाय, या फोनला IP69K रेटिंग आहे, ज्यामुळे फोन धूळ, उच्च तापमान आणि पाण्यात सुरक्षित होतो. हा एक मजबूत फोन आहे, जो इनडोअर आणि आउटडोअरसाठी सर्वोत्तम भागीदार बनू शकतो, असा कंपनीने दावा केला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की स्मार्टफोन आधी नोकिया XR30 म्हणून रिलीज होण्याची अपेक्षा होती. हे Nokia XR21 म्हणून लाँच केले आहे. Nokia XR21 जर्मनीमध्ये EUR 599 याची अंदाजे किंमक ५४,२१६ रुपयांमध्ये उपलब्ध होऊ शकतो. आणि UK मध्ये GBP ४९९ (अंदाजे रु. ५१,२६७) मध्ये एकमेव 6GB + 128GB मॉडेलसाठी उपलब्ध असेल. सर्व-नवीन Nokia XR21 सध्या जर्मनी आणि निवडक बाजारपेठांमध्ये उपलब्ध आहे. ते जूनपासून यूकेमध्ये उपलब्ध होईल. हा स्मार्टफोन पाइन ग्रीन आणि मिडनाईट ब्लॅक या दोन रंगांच्या पर्यायांमध्ये लाँच करण्यात आला आहे.

नोकिया XR21 डिस्प्ले: 120Hz च्या रिफ्रेश रेटसह ६.४९-इंचाचा FHD+ २०:९ डिस्प्ले आणि तब्बल ५५० nits ब्राइटनेस आहे. मागील कॅमेरा: LED फ्लॅशसह 64MP रिअर कॅमेरा आणि 8MP अल्ट्रा-वाइड कॅमेरा. **फ्रंट कॅमेरा :** 16MP **सेल्फी कॅमेरा**. Qualcomm Snapdragon 695 हा चिपसेट आहे जो Adreno 619L GPU सह येतो. स्टोरेज: 6GB RAM आणि 128GB अंतर्गत स्टोरेज आहे. बॅटरी: 4800mAh बॅटरी आहे जी 33W फास्ट चार्जिंग सपोर्टसह प्रदान केली गेली आहे. ३.५ मिमी ऑडिओ जॅक, साइड-माउंट फिंगरप्रिंट सेन्सर, यूएसबी टाइप-सी, ब्लूटूथ ५.१, स्टिरिओ स्पीकर आणि बरेच काही आहे.

# शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील



विशेष

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका' हा त्यांचा मंत्र होता. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणप्रसार करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. भाऊरावांनी मागास आणि गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू करून मोठे काम केले. ते जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. भाऊराव पाटील यांना १९५९ साली त्यांच्या कार्याबद्दल 'पद्मभूषण' हा पुरस्कारही मिळाला. आज ९ मे त्यांची पुण्यतिथी आहे. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आपण त्यांच्या एकंदरीत आयुष्याविषयी जाणून घेणार आहोत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावात शेतकरी कुटुंबात झाला. भाऊराव यांनी लहानपणापासुनच आपले आयुष्य जात-पात न पाळता असपृश्यांसोबत आणि त्यांच्यासाठी खर्ची घातले होते, त्यांच्यावर राजर्षी शाहु महाराज यांच्या कामाचा मोठा प्रभाव होता. भाऊरावांनी दलित व अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण काम केले होते, कमवा आणि शिका योजना तसेच रयत शिक्षण संस्था ही त्याच कामाची उदाहरणे आहेत.

४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजया दशमीच्या मुहूर्तावर त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना कऱ्हाड जवळच्या काले गावात केली. सन १९२४ मध्ये रयतचे कार्यालय सातारा येथे हलवण्यात आले. सन १९५४ मध्ये त्यांनी सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू केले. त्यानंतर लगेचच कऱ्हाड येथे संत गाडगेबाबा कॉलेज सुरू केले. सन १९५५ मध्ये चांगले शिक्षक घडवण्याच्या उद्देशाने, मौलाना आझाद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले. त्यांचा प्रमुख उद्देश शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करून सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याचा होता. या सर्व कार्यात महात्मा फुलेंचा त्यांच्या मनावर जबरदस्त पगडा होता. भाऊराव पाटील यांनी सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी ३८ वसतिगृहे असलेल्या शाळा आणि हायस्कूल सुरू केली, तसेच ५७८ शाळा, सहा ट्रेनिंग कॉलेज, १०८ हायस्कूल आणि तीन महाविद्यालये सुरू केली. महाराष्ट्रातील लोकांनी त्यांना कर्मवीर' ही पदवी दिली. कृतिशील राजा असाच त्याचा अर्थ आहे. रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील फार मोठी शिक्षण संस्था त्यांनी निर्माण केली.

सन १९५९ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांना पुणे विद्यापीठाने डी.लिट. पदवी देऊन सन्मानित केले. त्याचवर्षी भारत सरकारने पद्मभूषण देऊन त्यांना सन्मानित केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनेकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवन प्रकाशमय केले. कर्मवीर भाऊराव पाटील ९ मे १९५९ रोजी त्यांचे निधन झाले. ग्रामीण भागातील शैक्षणिक कार्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य कायम आठवणीत राहणारे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मृत्यु पश्चात सातारा येथे त्यांचे समाधिस्थान व कर्मवीर स्मृतिभवन उभारण्यात आले आहे. तेथे भाऊराव पाटलांच्या स्मृती जतन करण्यात आल्या आहेत.

**(साभार : इंटरनेट)**

क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : दिवेआगरच्या अथांग समुद्रकिनारी सायंकाळच्या वेळी घोडागाडीतून रपेट मारताना पर्यटक.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# व्हिटॅमिन बी १२च्या कमतरतेमुळे काय होते?

व्हिटॅमिन बी १२ शरीरातील इतर अनेक घटक तयार करण्यास मदत करते, जसे की ज्येष्ठता, ज्यामुळे आपल्या शरीराची उर्जा वाढते. हे एक व्हिटॅमिन आहे जे आपले शरीर स्वतः बनवू शकत नाही, म्हणून आपण खाल्लेल्या वस्तूंमधून ते नियमितपणे घेतले पाहिजे.



व्हिटॅमिन बी १२ आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे, कारण ते रक्त पेशी तयार करण्यास मदत करते जे आपल्या शरीराच्या इतर भागात ऑक्सिजन पोहोचविण्यास मदत करतात. याशिवाय व्हिटॅमिन बी १२ शरीरातील इतर अनेक घटक तयार करण्यास मदत करते, जसे की ज्येष्ठता, ज्यामुळे आपल्या शरीराची उर्जा वाढते. हे एक व्हिटॅमिन आहे जे आपले शरीर स्वतः बनवू शकत नाही, म्हणून आपण खाल्लेल्या वस्तूंमधून ते नियमितपणे घेतले पाहिजे.

अनेकदा व्हिटॅमिन बी १२ अन्नपदार्थांमधून पुरेशा प्रमाणात मिळत नाही, ज्यामुळे शरीरात त्याची कमतरता भासते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे थकवा, गोंधळ, डोकेदुखी, पोटात अपचन, भूक न लागणे, हात-पायांना सूज येणे आणि अशक्तपणा येऊ शकतो. व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दीर्घकाळ लपवून ठेवली तर यामुळे न्यूरोलॉजिकल समस्या, कमकुवत मन आणि अस्थिर मेंदू अशा अनेक समस्या उद्भवू शकतात. आज आपण व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे होणाऱ्या गंभीर आजारांबद्दल बोलणार आहोत.

**व्हिटॅमिन बी १२ समृद्ध पदार्थ**

**मांस-** मांस (कोकरू, शेळीचे मांस, कोंबडीचे मांस) व्हिटॅमिन बी १२ चा समृद्ध स्त्रोत आहे. त्यामध्ये व्हिटॅमिन बी १२ मोठ्या प्रमाणात आढळते.

**सीफूड-** सीफूड जसं की फिश, फिश ऑइल. शिजवलेल्या ६ औंस सॅल्मन माशांमध्ये व्हिटॅमिन बी १२ दैनंदिन गरजेच्या १२% पेक्षा जास्त असते.

**दूध आणि दुग्धजन्य पदार्थ -** दूध, चीज, दही, तूप इ. देखील व्हिटॅमिन बी १२ चे समृद्ध स्त्रोत आहेत. दूध रोजच्या गरजेच्या ४६ टक्के भाग भागवू शकते.

**अंडी-** अंडी व्हिटॅमिन बी १२ चा चांगला स्रोत आहेत. रोज सकाळी ब्रेकफास्टसाठी तुम्ही हे खाऊ शकता. दोन मोठी अंडी दैनंदिन गरजेच्या ४६% भाग भागवू शकतात.

# हिरवा चारा खाल्ल्याने १९ जनावरांना विषबाधा

## कर्जत तालुक्यातील घटनेत चार म्हशींचा मृत्यू ; १५ जनावरे बचावली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेवाळी येथील शेतकऱ्याच्या जनावरांनी हिरवा चारा खाल्ल्याने या शेतकऱ्याच्या १९ जनावरांना विषबाधा झाली. त्यातील चार दुभत्या म्हशींचा मृत्यू झाला आहे. अन्य जनावरांना वाचविण्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना यश आले आहे.

जनावरांसाठी हिरवा चारा मिळावा म्हणून नेवळी येथील यशवंत भागित यांनी आपल्या शेतात मका, बाजरी तसेच अन्य प्रकारचा चारा यांची लागवड केली होती. त्यांच्या १९ जनावरांनी तो चारा खाल्ला. त्यानंतर काही मिनिटात काही जनावरे जमिनीवर कोसळली. त्यांनी तातडीने वाकस येथून पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. शशिकांत थोरात याना पाचारण केले. त्यांच्या मदतीला डॉ. सागर कसबे, तसेच पशुधन विभागाचे चेतन लांघी आणि झगडे नेवाळी गावात आले. त्यांनी कोसळलेल्या जनावरांची तपासणी सुरू केली. पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तातडीने सर्व जनावरांवर औषध उपचार सुरू केले आणि त्यामुळे अनेक जनावरे वाचविण्यात डॉक्टरांना यश आले. मात्र चार म्हशींचा या घटनेत मृत्यू झाला आहे.

म्हशींच्या मृत्यूमुळे दुग्ध शेतकरी यशवंत भागित यांचे तब्बल सव्वा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मात्र शेतकरी भागित यांनी आपल्या जनावरांना हिरवा चारा मिळावा म्हणून आपल्या शेतात ज्वारी टाकली होती. त्या हिरव्या चाऱ्यात विषारी द्रव्य तयार होत असते. ते विषारी द्रव्य ज्वारीच्या हिरव्या चाऱ्याबरोबर खाल्याने १९ जनावरांना विषबाधा झाली आहे. शेतातील कोवळी ज्वारी खाल्ल्याने पशुधन यास मोठा धोका होऊ शकतो, असा निष्कर्ष पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी काढला. शेतकऱ्यांनी हिरवा चारा हा जनावरांना खायला देताना तो कोवळा चारा खाण्यास घालू नये अशी सूचना शेतकऱ्यांना केली आहे. शेतकऱ्यांनी संतुलित आहार आणि चारा पाणी देताना काळजी घ्यावी, असे आवाहनही तालुका पशुधन अधिकारी डॉ. डी. आर. जाधव यांनी केले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-20/ 2023-24 Dt. 28.04.2023 **RFx No. 7000027221** | **Sub.:** Extension for SRM E-Tender for the work of various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Div., Mahad for the year 2022-23. | Up to Rs. 7,00,000/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be the 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is higher
**Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission:** From 28.04.2023 @ 00:00 Hrs to 07.05.2023 @ 23:59 Hrs & **Further Extended up to** 15.05.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**



# रेवदंडा पूल लवकरच वाहतुकीसाठी उपलब्ध होणार –आमदार महेंद्र दळवी

**मुरुड : प्रतिनिधी**

रेवदंडा–साळाव येथील कुंडलिका खाडीवरचा पूल दुरुस्तीसाठी काढल्याने सर्वसामान्य नागरिकांना जिल्ह्याच्या मुख्यालय गाठणे कठीण होऊन बसले आहे. कारण या पुलावरून अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांची एसटी वाहतूक सुद्धा बंद करण्यात आली आहे. फक्त चार चाकी छोटी वाहने सुरु आहेत. एसटी वाहतूक बंद झाल्याने लोकांची वर्दळ कमी होऊन एसटी तसेच असंख्य व्यापारी यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. विक्रम रिक्षा वाहतूक सायंकाळी सहा वाजता बंद होते. त्यामुळे मुंबई वरून मुरुडकडे प्रवासी वर्गाला मोठ्या समस्येशी झगडावे लागत आहे.

मुरुडला येणारी वर्तमानपत्र सुद्धा खूप उशिरा येऊ लागली आहेत. साळाव वरून मुरुडला येणारी एसटी बस सकाळी ८ किंवा ८–३० पर्यंत ठेवल्यास वर्तमानपत्र अचूक वेळेत पोहचतील परंतु आगार व्यवस्थापक नीता जगताप दुर्लक्ष करीत असल्याने हि गाडी सुरु होत नाही. याबद्दल वृत्त पत्र विक्रेते यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मुरुड येथे आमदार महेंद्र दळवी एका कार्यक्रमासाठी आले असताना पुलाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले, साळाव –रेवदंडा पुलाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच हा पूल वाहतुकीसाठी मोकळा केला जाणार आहे. पुलाची दुरुस्ती लवकरात लवकर व्हावी याचा आढावा मी घेत असतो. ३१ मे पर्यंत सदरच्या पुलावरून वाहतुकीस सुरुवात होणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकारांना दिली आहे. साळाव –रेवदंडा पुलाचे काम करणे खूप आवश्यक होते. यासाठी राज्य शासनाकडून या पुलाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी ५० लाख रुपये खर्च केला असल्याची माहिती सुद्धा यावेळी त्यांनी दिली. नागरिकांनी घाबरून जाऊ नये लवकरच पुलावरून वाहतूक सुरु होणार असल्याचे संकेत दळवी यांनी दिले.




अॅड. नित्यानंद राम ठाकूर

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात**

फौ.चौ. अर्ज क्र. ४४०/२०२३
नि. ७/ड
ने. ता. १३/०६/२०२३

मोहम्मद आरिफ खान
वय २८ वर्षे, व्यवसाय – नोकरी
राहणार – फ्लॅट नं. ४०४, ४ था मजला, सेक्टर नं. ८ एफ,
प्लॉट नं. २१, उलवे, नवी मुंबई, ता. पनवेल, ............. अर्जदार

**विरूध्द**

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
गव्हाण ग्रामपंचायत, गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६............... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा हुजैफा आरीफ खान हयाचा जन्म १९/०४/२०२० रोजी फ्लॅट नं . ४०४, ४ था मजला, सेक्टर नं. ८ एफ, प्लॉट नं. २१, उलवे, नवी मुंबई, ता. पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. परंतु अर्जदार यांच्या अज्ञानामुळे/अनावधानाने शासन दफ्तरी कु. सहर्षा यांच्या जन्माची नोंद करणे राहून गेले आहे. सबब अर्जदार यांनी हुजैफा आरीफ खान च्या जन्माची नोंदणी करण्याचे आदेश होण्याकरिता या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यांस त्यांच्या मागणीप्रमाणे हुजैफा आरीफ खान च्या जन्माची नोंद होण्याकरीता कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मे. कोर्ट योग्य ते आदेश करतील याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०६/०५/२०२३ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/–** कनिष्ठ लिपीक प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल | कोर्टाचा शिक्का | **सही/–** सहा. अधिक्षक प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल



**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ प्रथम सुधारणा नियम २०१७ मधील नियम ७५ (२) खंड (ड)**

**संस्थेचे नाव व पत्ता : प्रियदर्शनी चालक मालक वाहक सहकारी वाहतुक संस्था मर्या. नागोठणे मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड**

संचालक मंडळ निवडणूक सन २०२४–२०२५ ते २०२९–२०३०

**निवडणूक कार्यक्रम**

संचालक पदासाठी निवडावयाच्या जागा खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेच्या क्रियाशील सभासदामधून निवडलेले सर्वसाधारण गटातून) | ०६ |
| २ | अनुसुचित जाती/जमाती सभासदांसाठी (राखीव) | ०१ |
| ३ | माहिलांसाठी (राखीव) | ०२ |
| ४ | इतर मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ |
| ५ | भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ |
| | **एकूण निवडावयाची संचालक संख्या** | **११** |

| अ.क्र | बाब | कालावधी | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्याचा दिनांक | ०९/०५/२०२३ | स. ११.०० वाजता | संस्था व निबंधक यांचे कार्यालय |
| २ | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती दिनांक | १०/०५/२०२३ ते १६/०५/२०२३ | स. ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ३ | नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | १६/०५/२०२३ | सायं. ३.०० वाजता | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ४ | नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक | १७/०५/२०२३ | दु. ०१.३० वाजता | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ५ | वैध नाम निर्देशनपत्राची यादी प्रसिध्दी दिनांक | १८/०५/२०२३ | स. ११.०० वाजता | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ६ | ज्या दिनांका पर्यत उमेदवारी मागे घेता येईल असा दिनांक | १९/०५/२०२३ ते ०२/०६/२०२३ | स. ११.०० ते दु.२.०० वाजेपर्यंत | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दी करण्याचा दिनांक व चिन्हाचे वाटप | ०५/०६/२०२३ | स. ११.०० वाजता | निवडणूक कार्यालय (निबंधक कार्यालय) |
| ८ | मतदान घ्यावयाचा दिनांक, वेळ व ठिकाण | ११/०६/२०२३ | स.८.०० ते सायं.४.०० वा. | संबंधीत संस्थेचे सभागृह |
| ९ | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ११/०६/२०२३ | सायं. ४.३० वा | संबंधीत संस्थेचे सभागृह |
| १० | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक | ११/०६/२०२३ | मत मोजणी नंतर लगेच | संबंधीत संस्थेचे सभागृह |

**टिप :–**
१) नामनिर्देशन पत्राची किंमत रु. ७५/– राहील
२) निवडणूक अनामत रक्कम रुपये ७५०/– व फक्त अनुसूचित जाती व अनुसुचित जमातीच्या जागासाठी २५०/– नामनिर्देशन पत्रासोबत भरणे बंधनकारक आहे.
३) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय (निवडणूक कार्यालय) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, रोहा, जि. रायगड येथे राहील.
४) राखीव मतदार संघातील उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याचा जातीचा दाखला जोडणे बंधनकारक आहे.
५) उमेदवारी अर्जास स्वतः चा अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचा १ फोटो, आधारकार्ड/निवडणूक कार्ड किंवा इतर शासनाकडून देण्यात आलेला फोटोसहीत पुरावा आवश्यक आहे.
६) शासकीय सुट्टीचे दिवशी निवडणूक कामकाज बंद राहील. (मतदान व मतमोजणीचा दिवस वगळून)

**सही/– (एस एल कावले) निवडणूक निर्णय अधिकारी प्रियदर्शनी चालक मालक वाहक सहकारी वाहतुक संस्था मर्या. नागोठणे मु.पो. नागोठणे** | शिक्का | **सही/– (टी एच लाटणे) तालुका सहकार निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, रोहा**

जा.क्र.३७३/सानिरो/प्रियद./निवड. कार्य./सन २०२३ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, रोहा जि. रायगड यांचे कार्यालय दिनांक : २१/०४/२०२३


# माथेरान पालिकेच्या दवाखान्यात रुग्णांची गैरसोय; स्थानिकांमध्ये संताप

**माथेरान :** नगर परिषदेच्या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी वेळेवर हजर नसल्याने रुग्णांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असून ह्या गलथान कारभारा बाबत स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नेहमीच औषधांचा तूटवडा तर आहेच शिवाय शासन नियुक्त वैद्यकीय अधिकारी हेच हजर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. ६ मे रोजी सायंकाळी एक मुलगी भाजली असताना तिला दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते परंतु त्याठिकाणी नियुक्ती करण्यात आलेल्या दोन्हीही वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती नसल्याने नाईलाजाने त्या मुलीला खाजगी क्लिनिकमध्ये उपचारार्थ दाखल केल्यामुळे त्या मुलीचे प्राण वाचले.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२२२३/प्र.क्र. ०४/११२४/२०२३ — दिनांक : ०८/०५/२०२३

**शुध्दीपत्रक –२**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१६४/ २०२२–२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भुखंड क्र. ४५८ कल्पतरु कॉम्प्लेक्स ते अंतिम भुखंड क्र. ४९१ ते ४८८ ते २६४ उरण नाक्या पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १८,५६,६४,९२७/– |
| २. | PMC/CE/१६५/ २०२२–२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील साई नगर रोड ते कर्नाळा स्पोर्टस कॉम्प्लेक्स सर्व्हे नं. ७४४ पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ८,११,३४,०३६/– |
| ३. | PMC/CE/१६६/ २०२२–२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाराणा प्रताप मार्गाचे कॉंक्रिटीकरण करणे. (परदेशी आळी) | ६,०४,२२,०५९/– |
| ४. | PMC/CE/१६७/ २०२२–२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रपिता महात्मा गांधी मार्गाचे कॉंक्रिटीकरण करणे. (संत जगनाडे महाराज चौक ते शनी मंदिर ते महावीर चौक, कापड गल्ली ते मौलाना आझाद चौक ते बंदर नाका आदिल टॉवर इमारती पर्यत) | २०,२०,३९,४३९/– |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०९/०५/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त –I**
**पनवेल महानगरपालिका**



**काजू फळपिक विकास योजनेचा लाभ घेण्यासाठी आवाहन**

याद्वारे जाहीर प्रकटन करण्यात येत आहे की, शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ अन्वये महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी काजू फळपीक विकास योजना लागू करण्यात आली आहे.

कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर व कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी काजूच्या सर्वकष विकासासाठी काजू फळपिक विकास योजना सन २०२२–२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत खालील बाबींसाठी अनुदान देणेत येत आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये भाग घ्यावा.

**काजू फळपिक विकास योजना सन २०२३–२४ लक्षांक**

| अ.क्र | घटक | अनुदान प्रमाण | योजना स्वरुप | जिल्हानिहाय लक्षांक: जिल्हा | भौतिक |
|---|---|---|---|---|---|
| १. | खाजगी क्षेत्रातील रोपवाटिका स्थापना व बळकटीकरण | किमान ५० गुंठे ते जारतीत जास्त १ हे.क्षेत्रापर्यंत कमाल अनुदान रु.७,५०,००० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (एफविका) | ठाणे | २ |
| | | | | पालघर | ५ |
| | | | | रायगड | ७ |
| | | | | रत्नागिरी | ८ |
| | | | | सिंधुदुर्ग | ८ |
| | | | | एकूण | ३० |
| २ | प्लास्टिक आच्छादनासह शेततळ्याची सुविधा | प्लास्टिक आच्छादन रु.७५०००/– | एफविका | ठाणे | २५ |
| | | | | पालघर | ७५ |
| | | | | रायगड | १०० |
| | | | | रत्नागिरी | १२५ |
| | | | | सिंधुदुर्ग | १२५ |
| | | | | एकूण | ४५० |
| ३ | सिंचनाकरीता विहिर | रु.२,५०,००० – प्रतिविहिर | कृषि विभाग जिल्हा परिषद | ठाणे | ५० |
| | | | | पालघर | १५० |
| | | | | रायगड | २०० |
| | | | | रत्नागिरी | २५० |
| | | | | सिंधुदुर्ग | २५० |
| | | | | एकूण | ९०० |
| ४ | काजू बागेमधील तण नियंत्रणाकरीता फवारणी यंत्र, पॉवर विडर व ग्रास कटरकरीता अनुदान | रु. १८,०००/– प्रतियुनिट | कृषि यांत्रिकीकरण योजना | ठाणे | ३३३ |
| | | | | पालघर | १००० |
| | | | | रायगड | १३३३ |
| | | | | रत्नागिरी | १६६७ |
| | | | | सिंधुदुर्ग | १६६७ |
| | | | | एकूण | ६००० |
| ५ | जुन्याबागांचे पुनरुज्जीवन करणे | ५०% व जास्तीत जास्त रु.२०,०००/– प्रति हेक्टर प्रमाणे ०.२० ते कमाल २.० हे. | एफविका | ठाणे | ५० |
| | | | | पालघर | ४५० |
| | | | | रायगड | १००० |
| | | | | रत्नागिरी | ५५०० |
| | | | | सिंधुदुर्ग | ५००० |
| | | | | एकूण | १२००० |
| ६ | काजू प्रक्रिया उदयोग आधुनिकीकरण | ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्र ४०% कमाल रु. १०.०० लाख व डोंगराळ/ अधिसूचित क्षेत्रात ५५% कमाल रु. १३.७५ लाख | ए. फ. वि. का./ मुख्य मंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना/ प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उन्नयन योजना | ठाणे | ५ |
| | | | | पालघर | १६ |
| | | | | रायगड | २१ |
| | | | | रत्नागिरी | २७ |
| | | | | सिंधुदुर्ग | २७ |
| | | | | एकूण | ९६ |
| ७ | पॅकहाऊस व ड्राईंग यार्ड उभरणे. | एकात्मिक पॅकहाऊस ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्र ३५% कमाल रु.१७.५० लाख व डोंगराळ/अधिसूचित क्षेत्रात ५०% कमाल रु. २५.०० लाख तसेच साधे पॅकहाऊस | एफविका | ठाणे | १० |
| | | | | पालघर | ४० |
| | | | | रायगड | १५० |
| | | | | रत्नागिरी | २०० |
| | | | | सिंधुदुर्ग | २०० |
| | | | | एकूण | ६०० |

घटकासमोर दर्शवलेल्या योजनेतून संबंधित घटकाचा लाभ देण्यात येणार असल्याने त्या त्या योजनेतून शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज करावयाचा आहे. ऑनलाइन अर्ज हा महा–ई–सेवा केंद्र किंवा कृषी विभागाच्या तालुकास्तरीय कार्यालयातून करता येईल. त्यासाठी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अर्जासोबत सातबारा उतारा, ८ अ उतारा, बँक खाते पासबुक पुस्तकाची पहिल्या पानाची प्रत, आधार कार्ड इत्यादी कागदपत्रे जोडून अर्ज अपलोड करायचा आहे.

कोकण विभागातील जास्तीत जास्त काजू उत्पादक शेतकऱ्यांनी व प्रक्रिया उद्योजकांनी काजू फळपिक विकास योजनेतील घटकांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टल वरून अर्ज करावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.

Link: https://drive.google.com/drive/folders/१nct७४lirGSZ२PAfA EXkoRQFbwiHVC_xa?usp=sharing

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

विमाका/कोवि/२०२३–२०२४/३२

**सही/–**
**(अंकुश माने)**
**विभागीय कृषी सहसंचालक,**
**कोकण विभाग, ठाणे**



।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

**खोपोली नगरपरिषद**
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र.केएमसी/बांधकाम/३८८ — दिनांक : ०८/०५/२०२३

**बांधकाम विभाग**
**निविदा सूचना क्र. ०६**

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सर्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ब–१ नमुन्यातील द्विनोंद लिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | काम करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. ५ जनता विद्यालय समोरील रस्ता पॅचवर्क करणे | ४,९७,०००/– | ५०१५ | १० दिवस | ५०० |
| २ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र. १० मध्ये शिळफाटा भाजीमार्केट समोरील रस्ता पॅचवर्क करणे | ४,९८,४०१/– | ५०१६ | १० दिवस | ५०० |
| ३ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. १० मध्ये शिळफाटा येथील श्रीराम मंदीर शेजारील चौधरी यांच्या घरासमोरील रस्ता पॅचवर्क करणे | ४,९७,५५०/– | ५०१७ | १० दिवस | ५०० |
| ४ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. ८ मध्ये आनंद नगर येथील रस्ता पॅचवर्क करणे | ४,९९,४३८/– | ५०१८ | १० दिवस | ५०० |
| ५ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. ७ मध्ये नरेंद्रघाडगे यांचे घर ते कुदळे यांच्या घरापर्यंत रस्ता पॅचवर्क करणे | ४,९९,०५४/– | ५०१९ | १० दिवस | ५०० |
| ६ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. ७ मध्ये यशदा निवास समोरील रस्ता पॅचवर्क करणे | ४,९६,६९३/– | ५०२० | १० दिवस | ५०० |
| ७ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. १० मध्ये डी. सी नगर येथील उत्सव बंगला ते हैदरी विला पर्यंतचा रस्ता पॅचवर्क करणे | ४,९५,५४०/– | ५०२१ | १० दिवस | ५०० |
| ८ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.९ मधील मिळगांव येथील शंकर मंदिर पासून सार्वजनिक शौचालय पर्यंतचा रस्ता पॅचवर्क करणे | ४,९९,४३९/– | ५०२२ | १० दिवस | ५०० |
| ९ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र. क्र. ७ मध्ये ग्रीन पार्क हॉटेल ते यशोदा निवास पर्यंतचा रस्ता पॅचवर्क करणे | ४,९७,५९७/– | ५०२३ | १० दिवस | ५०० |

**कामाच्या अटी व शर्ती:–**
१. निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि.०९/०५/२०२३ ते २३/०५/२०२३ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं ५.३० वा पर्यंत राहील. मात्र या करिता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर बांधकाम विभागातुन फॉर्म उपलब्ध करून मिळेल.
सविस्तर कामासंबधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**

## उरणच्या पीरवाडी किनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी

# स्थानिकांच्या व्यवसायामध्ये वृद्धी

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणच्या पीरवाडी समुद्र किनाऱ्यावर रविवारच्या सुटीमुळे पर्यटकांनी मांदियाळी भरली आहे. उन्हामुळे होणारी अंगाची काहिली शमविण्यासाठी पर्यटक समुद्रात डुंबण्याचा तसेच लाटांचा आनंद घेत आहेत. उरणमधील पीरवाडी हा तसा छोटासा किनारा आहे, मात्र तरीही या किनारपट्टीवर सुटीचा आनंद लुटण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे.

सध्या मुलांच्या शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे पिरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. या परिसरात मुंबईच्या धर्तीवर उच्च दर्जाच्या राहण्या-खाण्याच्या सुविधा म्हणून हॉटेल्स उभे राहिले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील इतर समुद्र किनाऱ्याप्रमाणे समुद्री पर्यटनासाठी पर्यटकांची पावले आता वळू लागली आहेत. याचा परिणाम आपोआपच पर्यटन आणि इथल्या व्यवसाय वाढीवर होऊ लागला आहे.



### ठाणे, नवी मुंबईतील नागरिक अधिक

**उरण पीरवाडी किनाऱ्यावर एक दर्गा असून या दर्ग्यावर येणारे भाविक हे मुंबई, ठाणे व नवी मुंबई सह इतर ठिकाणाहून येतात. यातील बहुतेक पर्यटक हे रविवार किंवा सुटीच्या दिवशी येतात. त्यामुळे सध्या पीरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांची संख्या वाढली आहे.**

## सानपाडा येथील भुयारी मार्गात वाहतूक कोंडी; नागरिक त्रस्त

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा रेल्वेस्थानकाच्या खालील भुयारी मार्गातून वाहनांची वर्दळ वाढली आहे. वाहतुकीच्या नियमांचे पालन होत नसल्याने या मार्गात दररोज संध्याकाळी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. यामुळे प्रवासी व वाहनचालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सायन-पनवेल महामार्गावर ये-जा करण्यासाठी सानपाडा रेल्वेस्थानकाच्या खालून लहान वाहनांसाठी भुयारी मार्ग बनविला आहे. नेरूळ, जुईनगर तसेच सानपाडा परिसरातील वाहनचालक एपीएमसी मार्केट, सायन-पनवेल महामार्ग आदी ठिकाणी ये-जा करण्यासाठी या भुयारी मार्गाचा वापर करतात. या भुयारी मार्गातून मागील काही महिन्यांपासून वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढलेली आहे. अनेकवेळा चुकीच्या पद्धतीने भुयारी मार्गात प्रवेश करणे, भुयारी मार्गात ओव्हरटेक करणे, वाहने थांबविणे, वाहने बंद पडणे आदी कारणांमुळे या भुयारी मार्गात वाहतूक कोंडीच्या समस्या निर्माण होत आहेत.

सानपाड़ा रेल्वेस्थानकाच्या बाहेरील बेकायदा रिक्षा स्टॅन्ड तसेच बेकायदा वाहन पार्किंगमुळेदेखील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. बेकायदा रिक्षा स्टँड तसेच पार्किंगवर कारवाई करण्याची मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.

## घणसोलीत खुलेआम जुगाराचे अड्डे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विभागात अनेक वर्षांपासून बंद असलेले सदगुरू हॉस्पिटलचा परिसर सध्या जुगाऱ्यांचा अड्डा झाला आहे. याठिकाणी दिवसाढवळ्या खुलेआम जुगार खेळला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

घणसोली विभागात अनेक ठिकाणी खुलेआम जुगाराचे अड्डे सुरू आहेत. वर्दळीच्या रस्त्यांवरील दुभाजकांच्या जागांसोबतच उड्डाणपुलाखालील मोकळ्या भूखंडांवर जुगाऱ्यांचा वावर आहे. अशातच घणसोली विभागातील सदगुरू हॉस्पिटलच्या आवारात देखील जुगाराचे अड्डे सुरू असल्याने परिसरातील शालेय मुलांवर याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने या प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी होत आहे.

**घणसोलीमधील शेतकरी शाळेच्या आवारात जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाली आहे. या ठिकाणची पाहणी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.**
**-अजय भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोपरखैरणे**

## बेशिस्त वाहतूकप्रकरणी कारवाईचा धडाका

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कारवाईचा धडाका लावला असून एप्रिल महिन्यात तब्बल ६२ हजार ५९९ एवढ्या कारवाई केल्या आहेत. त्यातील एक हजार ९८९ प्रकरणे लोकअदालत मध्ये निकाली लागले असून त्यातून नऊ लाख ९० हजार ९५० दंड वसुली झाली आहे.

आधुनिक शहरात अत्यंत बेशिस्त वाहतूक हे नवी मुंबईचे चित्र असून याबाबत आता वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. केवळ एप्रिल महिन्यात ६२ हजार ५९९ एवढ्या कारवाई केल्या आहेत. ज्यात अतिवेगाने वाहन व चालविणे सिटबेल्ट ६ हजार ८४३, विना हेल्मेट सात हजार ८९७, सिग्नल तोडणे १२८, मद्य प्राशन करून वाहन चालविणे १२ हजार ४६६, विना हेल्मेट १हजार ८९८, धोकादायक वाहन चालविणे ९१, गाडी चालवताना मोबाईल संभाषण एक हजार २१ अशा महत्त्वाच्या वाहतूक नियम भंग कारवाई केल्या आहेत तर बाकी अन्य कारवाई आहेत. या कारवाई नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील १६ वाहतुक शाखांकडून एप्रिल २०२३ मध्ये मोटर वाहन कायदा कलमान्वये करण्यात आल्या आहेत.

## तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांची दहशत

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल पालिका हद्दीतील मोकाट कुत्र्यांचे पालिकेकडून निर्बिजीकरण केले जाते. त्यासाठी एका एजन्सीची नेमणूक केली आहे, तरीदेखील कुत्र्यांची संख्या वाढत असल्याने तळोजा वसाहतीत भीतीचे वातावरण आहे.

पनवेल महापालिकेकडून शहरातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले जात आहे. कुत्र्यांची संख्या आटोक्यात राहावी यासाठी पालिकेकडून एका एजन्सीचीदेखील नेमणूक करण्यात आली आहे. असे असताना तळोजा वसाहतीत मात्र मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये या कुत्र्यांनी दहशत निर्माण केली असून सायकल, दुचाकीवरून जाणाऱ्या व्यक्तींच्या मागे लागत असल्याने अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे या भागात असलेल्या खाद्यपदार्थांच्या दुकानांमुळे कुत्र्यांना सहजपणे अन्न उपलब्ध होत असल्याने त्यांची संख्या वाढल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे.



**तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. महापालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.**
**-कैलास घरत, रहिवासी, तळोजा**

### मुबलक अन्नामुळे संख्येत वाढ

**चिकन बिर्याणी तसेच रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या चायनीजच्या हातगाडी तसेच चिकन विक्रेता टाकाऊ खाद्यपदार्थ रस्त्यालगत असलेल्या नाल्यात टाकून पसार होतात. त्यामुळे मोकाट कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी तळोजावासीयांकडून होत आहे.**

## महिलेचा विनयभंग; आरोपीस अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी रसायनी पोलिसांनी एकाला गजाआड केले आहे. भोकरपाडा येथील हिरानंदानी येथील एक विवाहित महिला आपल्या घरामध्ये एकट्याच असताना त्यांच्या शेजारील फ्लॅटमध्ये फर्निशिंगचे काम करणारा गुड्डू भोला यादव (रा. कल्याण) हा सदर महिलेच्या रूमच्या बाल्कनीतून प्रवेश करून बेडरूममध्ये घुसला. महिला झोपेत असताना सदर महिलेशी अंगलट करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे गैरकृत्य केले.

महिलेने त्यास विरोध करून स्वतः ची सुटका करून घेतली व ताबडतोब रसायनी पोलीस ठाणे गाठले. महिलेचा विनयभंग केल्या प्रकरणी गुड्डू यादव याच्यावर भा. दं. वि. कलम ३५४, ४५२ नुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटकही करण्यात आली आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार पोलीस शिपाई श्री. म्हामुणकर व श्री. पाटील अधिक तपास करीत आहेत.



## घाऊक बाजारामध्ये बटाट्याच्या दरात वाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीतील एपीएमसी घाऊक बाजारात आवक कमी झाल्याने बटाट्याच्या दारात वाढ झाली आहे. बाजारात शनिवारी प्रतिकिलो १०-१२ रुपयांनी उपलब्ध असलेला बटाटा शनिवारी १५ ते १६ रुपयांनी विक्री झाला आहे. मागणी जास्त असून आवक कमी झाल्याने दरवाढ झाली आहे.



वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या बटाट्याची आवक कमी होत आहे. त्यामुळे मागणी जास्त असल्याने दरवाढ होते. फेब्रुवारीमध्ये बटाट्याचे दर वधारले होते, परंतु नवीन बटाटा दाखल होताच, दर आवाक्यात आले होते.

सध्या बाजारात परराज्यातील बटाटा दाखल होत आहे. कांदा बटाटा बाजार समितीत सद्यस्थितीत गुजरात, मध्यप्रदेश, युपी या परराज्यातुन बटाट्याची आवक सुरू आहे. घाऊक बाजारात शनिवारी ३५ गाड्या दाखल झाल्या आहेत. तेच मागील आठवड्यात ४०ते ५०हुन अधिक गाड्या आवक होती. आवक कमी होत आहे,त्यामुळे ही दरवाढ झाली आहे अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. मागील आठवड्यात प्रतिकिलो बटाटा १०-१२ रुपयांवरून आता १५-१६ रुपयांनी विक्री होत आहे.

## कोकण विभागीय लोकशाही दिनी नऊ अर्ज निकाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या दोन असून आज आलेल्या अर्जांची संख्या आठ असे एकूण प्राप्त अर्ज १० होते. त्यापैकी नऊ अर्ज निकाली काढण्यात आला. सध्या एक तक्रार प्रलंबित आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

## खंडणी उकळणारे दोघे गजाआड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्पा व मसाज पार्लरमध्ये अल्पवयीन मुलींकडून वेश्याव्यवसाय चालवला जातो. अशांना धमकावून वाशी सेक्टर- ३० मधील एका स्पाचालक महिलेकडून १५ हजारांची प्रतिमहिना खंडणी मागणाऱ्या टोळीतील दोघा तरुणांना वाशी पोलिसांनी अटक केली आहे; तर या टोळीतील इतर तरुणांचा शोध सुरू आहे.



कल्याण भागात राहणारे गणेश गोवेकर (वय २६) आणि अक्षय सोनावणे (वय २७) यांच्यासह ऋतिक केदार व साहिल पाटणकर बेरोजगार आहेत. या चौकडीने २५ एप्रिल रोजी वाशी सेक्टर-३० ए मधील फोनिक्स स्पा चालवणाऱ्या तरुणीला तिच्या स्पामध्ये अल्पवयीन मुलींकडून वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याने पोलिस कारवाईची भीती दाखवली होती. तसेच शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान संस्थेच्या लेटरहेडवर स्पाचालकाविरोधात खोटा तक्रारअर्ज पोलिसांकडे केला होता. तसेच तरुणीकडे १५ हजार रुपये प्रतिमहिना खंडणी तसेच शरीरसुखाची मागणी केली होती. त्यामुळे घाबरलेल्या स्पाचालक तरुणीने वाशी पोलिसांकडे याबाबत तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीनंतर वाशी पोलिसांनी रविवारी (दि. ७) सायंकाळी सापळा लावत गणेश गोवेकर आणि अक्षय सोनावणे याला ताब्यात घेतले; तर इतर दोघा आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणातील अटक केलेले तरुण वेगवेगळ्या भागांतील स्पा व मसाज पार्लर, त्याचप्रमाणे लेडीज बार व इतर बेकायदा धंदे सुरू असलेल्या ठिकाणी जात होते. त्यानंतर ते शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान या संस्थेचे पदाधिकारी असल्याचे सांगून त्यांना धमकावत होते. त्यानंतर त्यांच्या बेकायदा धंद्यांविरोधात शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान या संस्थेच्या लेटरहेडवरून पोलिसांकडे तक्रार करत खंडणी उकळत होते.

**या कारवाईत अटक करण्यात आलेल्या तरुणांनी वाशीतील अनेक स्पा व मसाज पार्लरचालकांना खंडणीसाठी धमकावल्याची माहिती मिळाली आहे. त्यानुसार त्यांची चौकशी करण्यात येत आहे. तसेच ज्या संस्थेच्या माध्यमातून लोकांना धमकावण्यात येत असे ती नोंदणीकृत आहे का, याचा तपास करण्यात येत आहे.**
**-शशिकांत चांदेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी**

## उरण बौद्धजन पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

**उरण : बातमीदार**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या बौद्धजन पंचायत समितीची सन २०२३ ते २०२६ साठी निवडणूक लोकशाही पध्दतीने मोठ्या उत्साहात झाले.

बौद्धजन पंचायत समिती ही संपूर्ण भारतात कार्यरत असून या समितीच्या माध्यमातून विविध सामाजिक धार्मिक उपक्रम राबविली जातात अशा या समितीच्या उरण शाखा क्रमांक ८४३ च्या अध्यक्षपदी प्रकाश धर्मा कांबळे, उपाध्यक्ष पदी हरेश दामोदर जाधव, चिटणीस पदी विजय रामचंद्र पवार, उपचिटणीस पदी रोशन पांडुरंग गाढे, खजिनदार-अनंत बुधाजी जाधव यांची एकमताने बिनविरोध निवड झाली आहे.

ही निवड २०२३ ते २०२६ या कालावधीकरीता झाली आहे. बिनविरोध निवडून आलेले पदाधिकारी हे गेली अनेक वर्षे बौद्धजन पंचायत समितीने दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन, अंमलबजावणी करत आहेत. त्यामूळे पदाधिकाऱ्यांची बहुमताने एकमताने बिनविरोध निवड झाली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नवी मुंबईत आजपासून उन्हाळी शिबिर

**नवी मुंबई :** शाळांना सुट्ट्या लागल्याने ठिकठिकाणी समर कॅम्प अर्थात उन्हाळी शिबिरांचे आयोजन केले जात आहे. 'आईकिया'तर्फेही (आयकेईए) मुंबई, नवी मुंबईत लहान मुलांसह पालकांसाठी उन्हाळी शिबिराचे मोफत आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (दि. ९)पासून वरळी, आरसीटी आणि नवी मुंबईतील स्टोअरमध्ये १९ मेपर्यंत हे शिबिर भरणार आहे. मोफत असणाऱ्या या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आईकियातर्फे करण्यात आले आहे.

## श्री महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात, संकष्टी चतुर्थी निमित्ताने सोमवारी (दि. ८) हजारो भाविकांनी उन्हाची तमा न बाळगता प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टीच्या आदल्या दिवशी म्हणजे रविवारीदेखील चिरनेरच्या महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गणेश भक्तांची रीघ लागली होती. रात्री ४ वाजताच मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले होते.

या वेळी प्रथम श्री महागणपतीचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात श्रींचे दर्शन घेतले. विशेष म्हणजे श्रींच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांचा अधिक समावेश दिसून आला ऐतिहासिक वारसा बरोबरच चिरनेरच्या भूमीला प्राचीन देवस्थानचा परिस्पर्श झाला आहे. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून, पेशवेकालीन मंदिरात श्री महागणपती विराजमान आहेत.

या श्रींच्या दर्शनासाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उरण, पनवेल, पेण तसेच अन्य भागातून आलेल्या हजारो भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. गणेश भक्तांना रांगेत सुरळीत दर्शन व्हावे यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील उत्तम करण्यात आली होती.

## नवी मुंबईत बालनाट्य अभिनय कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नवी मुंबई, संत शिरोमणीकला मंच, नवी मुंबई आणि नवी मुंबई बालरंगभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने २५ एप्रिल ते ६ मे २०२३ या कालावधीमध्ये बालनाट्य अभिनय कार्यशाळा आयोजित आयोजितकेली होती.



या कार्यशाळेचा समारोप रविवारी (दि. ७) सकाळी ११ वा विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे झाला. गेली २७ वर्ष ज्येष्ठ रंगकर्मी श्रीहरी पवळे उन्हाळी आणि दिवाळी सुटीत शिबिराचे आयोजन करून मार्गदर्शन करीत असतात. हे ५४ ना वे शिबिर होते.

या वेळी ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. अशोक बोंडे अशोक पालवे, प्रशांत निगडे अर्चना खरात, रंगराव घागरे आणि प्रभात ट्रस्टचे प्रशांत थोरात उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते शिबीरार्थींना प्रमानपत्र देण्यात आले त्याच बरोबर राज्यनाट्य स्पर्धा, बालनाट्य स्पर्धांमध्ये ज्यांनी नवी मुंबईचे नांव उज्वल केले असे अशोक पालवे, प्रशांत निगडे यांचा संस्थेतर्फे नाट्यगौरव सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले.

सातत्याने सत्तावीस वर्ष शिबिर यशस्वी पणे कार्य करणारे श्रीहरी पवळे यांचाही सत्कार करण्यात आला. सतत बारा दिवस बालनाट्य कार्यशाळेत विद्यार्थांना नाटकाचा विविध अंगाचा अभ्यास, सर्वांगीन विकासआणि शिस्तीचे धडे श्री. पवळे यांनी दिले.

समारोपावेळी विद्यार्थांनी आवली कावली पावली, चमत्कार, सवाल दस लाख का?, आणि आलबत्या मुक्त झाला. ह्या बालनाटीकासादर करून रसिकांचे मने जिंकली आणि पालकांनीही विद्यार्थांचे भरभरून कौतुक केले. या शिबिरात माजी विद्यार्थी श्रेया चव्हाण, सौरभ धुमाळ, आकांक्षा कदम, प्रारंभी पालकर, मिनल भोईर ओमकार वंडेकर, ओमकार कोळपकर नवी मुंबई लावणी सर्वांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रारंभी पालकर आणि आभार श्रीहरी पवळे यांनी मानले.

# पेणमधील मिठागरे झाली नामशेष

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका एकेकाळी मिठासाठी संपन्न तालुका म्हणून ओळखला जात होता. पेण तालुक्यात एक-दोन नव्हे तर २७ मिठागरे होती. भातशेती, गणपती व्यवसायानंतर मीठ उद्योगावर पेण तालुक्याचे अर्थः कारण चालत होते. पेणमध्ये ४-४ मिठाच्या गिरणी होत्या. अंतोरा येथे बशीर कासम आणि त्यांचे बंधू, पेण देवआळीत सदानंद देव आणि त्यांचे बंधू, आताच्या नगरपालिकेच्या कार्यालयाच्या ठिकाणी हजारेंची मीठ गिरण होती. मोठ्या प्रमाणात मीठ उत्पन्न होत असल्याने भुंडा पुलाच्या शेजारी आता भगतवाडा आहे त्या ठिकाणी देखील मीठ गिरण होती व त्याच्या भोवताली मोठ्या प्रमाणात मिठाची साठवण पावसाळ्यासाठी केली जात होती. या ठिकाणचे मीठ मोठ्या प्रमाणात त्यावेळी धारावीला जात होते. या ४ गिरणींच्या सोबतच बैलगाडीवाले गावो-गावी जाऊन मीठ विक्री करत होते. पूर्वी बैलगाडीवाले प्रत्येकजण ५-५ टन मीठ गावोगावी हिंडून विकत असत परंतु आज बैलगाडीही लुप्त झाली आणि मीठ विक्रेतेही.

दहा ते बारा वर्षापूर्वी जिल्ह्यात दरवर्षी ३० ते ३५ हजार टन मिठाचे उत्पादन घेतले जात होते. आता फक्त ते दीड हजार ते दोन हजार टनापर्यंत खाली आले आहे. रायगड जिल्ह्याची भाताचे कोठार ही ओळख जशी पुसली गेली तशीच, मिठाचे कोठार ही ओळख ही पुसली गेली आहे. काही मोजके शेतकरी आजही मीठाची शेती करीत ही ओळख कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिर्की येथील कल्पेश पाटील यांच्याशी बोलल्यानंतर प्रकर्षणाने एक गोष्ट लक्षात आली की मिठागरात काम करण्यासाठी मजूरही उपलब्ध होत नाहीत. एक काळ असा होता की, जानेवारी ते मे या कालावधीत मिठागरातून पुरुष वर्गाबरोबर महिला वर्गाला देखील चांगला रोजगार मिळायचा. उचेडे, कादळेपाडा, मळेघर, पिंपळपाडा, या विभागातील पुरूष मंडळी मोठया प्रमाणात मिठागरात काम करायचे तसेच येथील वाहनांना देखील चांगला धंदा पाच महिन्यासाठी मिळायचा कांदळे येथील अनंत पाटील आणि बाळाराम ठाकूर हे दोघे मुकादम म्हणून काम पहायचे आणि यांच्यासोबत ३० ते ३५ तरुण असायचे मात्र, आज तरुण वर्ग मिठागरात काम करण्यासाठी धजावत नाहीत त्यामुळे गुजरात येथून मजूर आणावे लागतात.

कल्पेश पाटील यानी सांगितले की, वाडवडिलांनी सांभाळलेला धंदा एकाएकी बंद करायचा नाही म्हणून परवडत नसताना देखील आम्ही मीठ उत्पादन घेत आहोत. साधारणतः एका वाफ्यामागे आठवड्याला एक टन मीठ उत्पन्न होते. असे आमच्या जवळ १५० वाफे आहेत. मात्र, यंदा अवकाळी पाउस पडल्यामुळे मोठया प्रमाणात उत्पन्नात घट झालेली आहे. २७ मिठागरांपैकी आता जेमतेम चार मीठागर मीठ उत्पादन घेतात यामध्ये चिखली अगर, हीरा अगर याचा समावेश आहे. उत्पादीत झालेले मीठ पुणे, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, खोपोली या ठिकाणी पाठवण्यात येते. या मीठाचा उपयोग वीट भट्टीसाठी तसेच मोठ-मोठया कंपनीमध्ये अर्थिंगसाठी व बर्फ निर्मितीसाठी देखील वापरला जातो आयुर्वेदाच्या दृष्टीने आता येणाऱ्या पिशवी बंद मिठापेक्षा विशेष महत्त्व आहे. त्यामुळे सर्वसामान्य आजहीं खडे मिठाची मागणी करत आहेत. आज फक्त आणि फक्त पारंपारिक धंदा जपण्याच्या दृष्टीने मिठागरात काही प्रमाणात मीठ उत्पन्न घेतले जात आहे. हीच बाब सत्य आहे. कालांतराने जिल्ह्यातील वाढते शहरीकरण हे मिठागरांना मारक ठरु लागले. हळूहळू मिठाची शेती कमी होत गेली तर काही धनदांडग्यांनी मिठागरे चालवणाऱ्यांना पैशाचे आमिष दाखवून कमी भावाने या जमिनी विकत घेवून गिळंकृत केलेल्या पहायला मिळतात.



कामगार मिळत नाहीत, खर्च परवडत नाही अशी अवस्था

### बैलगाडीच्या घुंगराचा आवाजही हरपला!

*बैलगाडीच्या घुंगरांचा आवाज आणि मीठवाले मीठ.... ही हाक कानावर आली की, महिलावर्गाची लगबग सुरु होत असे. बैलगाडीजवळ गर्दी होई आणि कोणी पावशेर, एक शेर, दोन शेर असे खड़ा मीठ बेगमीला (पावसाळ्यासाठी) खरेदी करीत असत. हे चित्र रायगड जिल्ह्यात दहा ते पंधरा वर्षांपूर्वी होते. आता ते दिसून येत नाही. कारण पेणची मिठागरे आता लुप्त झाली आहेत.*

**मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणामध्ये मिठागरे गेल्याने मीठ उत्पादन नामशेष झाले. त्यामुळे आमचा मीठ व्यवसाय बंद झाला. आम्ही मीठ आता भाईंदर, पालघर, बोईसर येथून खरेदी करून विकत आहोत.**

**- आनंद जाधव, मीठ विक्रेते**

# जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन यंत्र पुन्हा बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन गेल्या काही दिवसांपासून बंद आहे. सिटी स्कॅन मशीन अचानक बंद झाल्याने रुग्णांचे हाल प्रचंड हाल होत आहेत. रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला आहे.

अलिबाग जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन अचानक बंद झाल्याने रुग्णांचे हाल प्रचंड हाल होत आहेत. तांत्रिक कारणामुळे मशीन बंद झाल्यास अलिबाग मधील लोटस् सिटी स्कॅन केंद्रासोबत सामंजस्य करार करण्यांत आला होता परंतु लोटस सिटी स्कॅन ही बंद असल्याने रूग्णांना वडखळ किंवा नवी मुंबई येथे जावे लागत आहे. गरिब रूग्णांना खाजगी रूग्णवाहिका करून जाणे अतिशय खर्चीक पडत आहे. अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात दररोज किमान दोनशेहून अधिक रुग्ण उपचारासाठी येतात. रुग्णांना चांगली सेवा मिळावी, तसेच अपघातग्रस्त व अन्य रुग्णांना तातडीने सिटी स्कॅनमार्फत आजाराचे निदान व्हावे, यासाठी अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करण्यात आली होती. मात्र तांत्रिक बिघाडामुळे मशीन वारंवार बंद पडत असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत.

रुग्णांना सिटी स्कॅनसाठी खासगी रुग्णालयात जावे लागल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तांत्रिक कारणामुळे मशीन बंद झाल्यास अलिबागमधील खाजगी केंद्रासोबत सामंजस्य करार करून गरिब रुग्णांना सिटी स्कॅन चाचणी मोफत पुरविण्याबाबत रुग्ण कल्याण समितीमधून तात्काळ मंजुरी दयावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी शासनाकडे केली आहे.



# वांगणी येथील नृत्य स्पर्धेत ओमसाई अकॅडमी प्रथम

## भाजप नेते धैर्यशील पाटील यांची उपस्थिति; ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळील वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्यमान सदस्य एकनाथ ठाकूर मित्र मंडळ वांगणी आयोजित जिल्हा स्तरीय नृत्य स्पर्धेचे उद्घाटन भाजपा नेते माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते शनिवारी संपन्न झाले. या स्पर्धेचे औचित्य साधुन वांगणी गावातील ७५ वर्ष पूर्ण झालेले ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार धर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या जिल्हास्तरीय नृत्यस्पर्धेत गृप मधून ओमसाई अकॅडमी पाली प्रथम क्रमांक मिळवुन स्पर्धेचा विजेता ठरला.

स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी राजिपचे माजी सदस्य किशोरभाई जैन, रायगड भाजप उपाध्यक्ष वैकुठ पाटील शिवसेना (शिंदे गट ) तालुका प्रमुख मनोजकुमार शिंदे, भाजप नेते प्रसाद भोईर, भाजप रोहा ता.अध्यक्ष सोपान सोपान जांबेकर, रोहा पं.स.चे माजी सदस्य संजय भोसले, भाजप ता.सरचिटणीस आनंद लाड, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, सामाजिक कार्यकर्ते हभप दळवी गुरुजी, यशवंत हलदे, माजी सरपंच लहू तेलंगे, रमेश भिसे, एकनाथ दळवी , युवा नेते निखिल मढवी, प्रविण ताडकर, विशाल म्हात्रे, शंकर ठाकूर, कांचन ठाकूर,संतोष जैन ,सुनील नावले, पंकज जांबेकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

स्पर्धेत गृप मधुन प्रथम क्रमांक ओमसाई अकॅडमी पाली, द्वितीय क्रमांक मुद्रा अकॅडमी शिहू, तृतीय क्रमांक एच बी ग्रील अकॅडमी मुरुड , उत्तेजनार्थ , हर्षाली ग्रुप अलिबाग, बल्लाळेश्वर ग्रुप पाली. वैयक्तिक मध्ये प्रथम क्रमांक रोशनी कदम महाड, द्वितीय क्रमांक ऋतिका शिंदे पाली, तृतीय क्रमांक वांशिता नाईक पाली, उत्तेजनार्थ दिशा भोपी अलिबाग, उत्तम शिद नागोठणे आदीं बक्षीस देण्यात आले. बक्षीस समारंभा प्रसंगी वांगणी माजी सरपंच विद्यमान सदस्य एकनाथ ठाकुर, माजी सरपंच लहू तेलंगे, भाऊ तेलंगे, सुरेश तेलंगे, सखाराम ठाकुर , परशूराम ठाकुर , रुपेश दळवी, प्रकाश ठाकुर, बाळा भिसे, ज्ञानेश्वर पवार खंडू तेलंगे, भरत यादव, प्रवीण कदम, सौरभ तेलंगे, शुभम तेलंगे, मनीष तेलंगे ,रोशन चव्हाण,नरेश चव्हाण, प्रतीक तेलंगे, हेमंत तेलंगे आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या चेअरमनपदी विनोद जोशी

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील एक अग्रगण्य पतसंस्था असलेल्या रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढी पेणच्या चेअरमनपदी विनोद हसुराम जोशी यांची निवड झाली आहे.

पेण शिक्षक पतपेढी ही शिक्षकांची कामधेनू म्हणून ओळखली जाते. या पतसंस्थेच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षकांना सहज कर्ज उपलब्ध होत असते. संस्था शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहे. नुकतीच चेअरमनपदासाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत चुरस निर्माण झाली होती, परंतु सोपान चांदे, शंकर पाटील, देवानंद पिंगळे, प्रमोद पाटील, अमरचंद पाटील, प्रसाद म्हात्रे, विश्वास ठाकूर, बिपिन साळवे, विनोद कडव, सखाराम जाधव यांनी ठरलेल्या योजनेप्रमाणे आणि परिवर्तन पॅनलच्या निष्ठावान संचालकाच्या एकजूटीने विनोद जोशी यांची चेअरमन म्हणून निवड केली.

**पतसंस्थेच्या विकासासाठी कटिबद्ध राहून विकासाचे एक एक पावूल ठोस टाकले जाणार आहे काही फायदे नजीकच्या काळात सभासदांना मिळतील, तर काही योजनांवर काम चालू आहे, ज्यातून भविष्यात पतपेढीच्या सभासदाला वैयक्तिक आपल्या खात्याची आणि इतर व्यवहारांची माहीती मिळेल.**

**-विनोद जोशी, अध्यक्ष**



# माणगाव तालुका होणार पाणीटंचाईमुक्त!

## १४७ योजनांपैकी १३७ कामे सुरू; १३८ कोटी खर्च अपेक्षित

**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाच्या ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत जल जिवन मिशन योजनेमधून माणगाव तालुक्यातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम शासनाने गेल्या वर्षापासून हाती घेतले असून वर्षानुवर्षे या तालुक्यातील अनेक गावे पाणीटंचाई आराखड्यात समाविष्ट करण्यात येतात. मात्र यावर शासन ठोस उपयोजना कधी करणार असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही माणगाव तालुक्यातील यंदाच्या वर्षी कांही गावे व वाड्या संभाव्य पाणी टंचाई आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहेत.

२०२१-२२मध्ये जल जिवन मिशन मधून विविध गावातील पाणीपुरवठा योजनांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु केली असून कांही गावातील योजनांचे विहीर व पंपघराचे काम पूर्ण झाले आहेत. तर कांही गावातील विहिरीचे खोदकाम पूर्ण झाले असून पाईपलाईनची कामे प्रगतीपथात आहेत. तर कांही ठिकाणी साठवण टाकीची कामे सुरु आहेत. ही कामे गेल्यावर्षी पूर्ण झाली असून ११ गावातील या योजन `तून पाणी वितरणाच्या चाचणीचे काम स्रुरु आहे. १४७ योजना तालुक्यात मंजूर झाल्या त्यापैकी १३७ योजनांची कामे सुरु आहेत. त्यामुळे या योजना डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होऊन ही गावे शासनाच्या संभाव्य पाणीटंचाई आराखड्यातून मुक्त होतील अशी आशा वाटत आहे.



माणगाव तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत १४७ पाणीयोजना मंजूर असून त्यापैकी १३७ पाणी योजनांची कामे सुरु आहेत. यासाठी १३८ कोटी रुपये या पाणीयोजनेवर खर्ची पडणार आहेत. माणगाव तालुका भौगोलिक व लोकसंख्येने मोठा आहे. या तालुक्यातील अनेक गावे व वाड्या दुर्गम व डोंगराळ असून तेथे दरवर्षी एप्रिल महिन्यापासून पाणीटंचाई सुरु होते. या गावांना शासन टॅंकरने पाणीपुरवठा करते. त्यामुळे ही गावे शासनाच्या पाणीटंचाई आराखड्यात समाविष्ट आहेत. या गावांना कायमस्वरूपी पाणीटंचाईतून मुक्त करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात आले असून १३८ कोटी रुपये आता खर्च पडणार आहे.

सध्या तारणे, बोरघर, उंबर्डी, रातवड, पन्हळघर बु., वाढवण, मुगवली, जावळी, खरवली-उमरोली, रानवडे कोंड, मंगरूळ या ११ गावातील पाणीयोजनेची कामे पूर्ण झाली असून पाणी सोडण्याची चाचणी सुरु आहे

### जलजीवन मिशन योजना

*पाणीपुरवठा योजना सुरु असलेल्या गावामध्ये कुठे विहीर खोदकाम, विहिरीचे प्लास्टर करणे, कांही ठिकाणी पाईप लाईनची कामे तर कांही ठिकाणी साठवण टाकी, पंपघराचे काम, पंप बसविने, उर्ध्व वाहिनीचे काम आदी कामे सुरु असून कमी जास्त प्रमाणात स्थिती आहे. मात्र १३७ कामे ही डिसेंबर २०२३ पर्यत पूर्ण करण्याचे उदिष्ट शासनांनी ठरविले असून डिसेंबरपर्यत १३७ योजना पूर्ण होऊन अनेक गावांना जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा होऊन तालुका पाणी टंचाई आराखड्यातून कायमची मुक्ती मिळेल या दिशेने प्रयत्न चालू आहेत.*

# मुरूड किनाऱ्यावरील टपरीधारकांवर अन्याय होणार नाही -आमदार महेंद्र दळवी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड समुद्र किनारा सुशोभीकरणासाठी राज्य शासनाकडून ११ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले असून लवकरच समुद्र सुशोभीकरणाच्या काम सुरु होणार आहे. समुद्र किनाऱ्याचा विकास होत असताना पर्यटकांना विविध सेवा पुरविणाऱ्या टपरी धारकांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. किनाऱ्याचे सौदरीकरण होत असताना टपरी धारकांना गाळे देण्याचे प्रयोजन निश्चित केले असून त्यांना या जागेत वसवले जाणार आहे. टपरीधारकांनी कोणतीही चिंता करू नये सुशोभीकरण होत असताना टपरीधारकांचा एक प्रतिनिधी घेतला जाणार असून आपला सल्ला सुद्धा घेतला जाईल असा महत्वपूर्ण दिलासा अलिबाग-मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी दिला आहे.

पद्मदुर्ग व्यवसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांच्या निवासस्थानी टपरीधारकांच्या वतीने सत्कार आयीजीत करण्यात आला होता. यावेळी आमदार दळवी यांनी हा दिलासा दिला आहे. या वेळी मुख्याधिकारी पंकज भुसे यांचा सुद्धा नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी पद्मदुर्ग व्यवसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर,उपाध्यक्ष दिव्या सतविडकर,सचिव शैलेश वारेकर, सहसचिव दामोदर खारगावकर, खजिनदार दीपक जोशी, सदस्य महेंद्र पाटील, सुषमा वारेकर, रुद्रायणी आंबुकर, उत्तम पाटील, ज्योती मसाल, शकील शाबान, इम्तियाज शाबान, गोपाळ शर्मा, रुपेश पाटील, उमेश दांडेकर व इतर टपरीधारक उपस्थित होते.



यावेळी आमदार दळवी म्हणाले, मुरुडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना सर्व सोई-सुविधा पुरविण्याचे काम टपरीधारक करीत असल्याने ते सुद्धा महत्वाचे घटक आहेत.मुख्याधिकारी याना मी आदेश दिले आहेत कि, टपरीधारकांना योग्य न्याय देण्यात यावा त्यामुळे टपरीधारकांवर कोणताही अन्याय होणार नसल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी आमदार यांच्याकडे मागणी केली कि, वादळी वारेव मुसळधार पाऊस यामुळे समुद्र किनारी असणाऱ्या टपरीधारकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असते. अश्यावेळी राज्य शासनाकडून नुकसानग्रस्त टपरीधारकांना मोबदला दिला जावा अशी मागणी केली.

भविष्यात मुरुड नगरपरिषदेकडून टपरीधारकांना गाळे मिळाल्यानंतर आम्हाला आस्सेमेन्ट देण्यात यावे अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

यावेळी अरविंद गायकर यांच्या हस्ते आमदार दळवी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी असंख्य टपरीधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अटीतटीच्या सामन्यात हैदराबादची बाजी

## राजस्थानला नमविले



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या दुसऱ्या सत्रातील सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सच्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करून विजय साकारला. शेवटच्या षटकात १७ धावांची आवश्यकता असताना अब्दुस समदने जोरदार फलंदाजी केली आणि अखेरच्या चेंडूवर षटकार ठोकून हैदराबादला विजय मिळवून दिला. संदीप शर्माचा नो बॉल हैदराबादच्या विजयाचा केंद्रबिंदू ठरला.

राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात जयपूरच्या सवाई मानसिंग मैदानात रंगला. राजस्थानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. राजस्थानच्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला. यशस्वी जैस्वाल, कर्णधार संजू सॅमसन आणि जॉस बटलरने चौफेर फटकेबाजी केली. त्यामुळे राजस्थानने २० षटकांत २ विकेट्स गमावत २१४ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर विजयासाठी धावांचा पाठलाग करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजांनी राजस्थानच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. शेवटच्या षटकात १७ धावांची आवश्यकता असताना अब्दुस समदने अप्रतिम फलंदाजी केली.

अमोलप्रीत सिंगने २५ चेंडूंत ३३ धावांची खेळी करून सनरायझर्स हैदराबादला चांगली सुरुवात करून दिली, पण युजवेंद्र चहलच्या गोलंदाजीवर सिंग झेलबाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्माने राजस्थानच्या गोलंदाजांचा समाचार घेऊन ३४ चेंडूंत २ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ५५ धावा कुटल्या, मात्र अश्विनच्या गोलंदाजीवर शर्माही अर्धशतक करून तंबूत परतला. त्यानंतर राहुल त्रिपाठीने २९ चेंडूंत ४७ धावांची खेळी साकारली, तर हेन्री क्लासेनने १२ चेंडूंत २६ धावा केल्या. चहलने भेदक मारा करून दोन्ही फलंदाजांना बाद केले आणि हैदराबादला मोठा धक्का दिला. त्यानंतर ग्लेन फिलिफ्सने षटकारांची हॅट्ट्रिक मारून ७ चेंडूंत २५ धावा केल्या. फिलिप्सने हैदराबादला विजयाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला होता, परंतु कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर शिमरन हेटमायरने त्याचा जबरदस्त झेल घेतला.

तत्पूर्वी, राजस्थानसाठी सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि जॉस बटलरने धडाकेबाज सुरुवात केली. जैस्वालने १६ चेंडूंत २ षटकार आणि ५ चौकार ठोकून ३५ धावा कुटल्या. मार्को जेनसेनच्या गोलंदाजीवर तो झेलबाद झाला. त्यानंतर बटलरने हैदराबादच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. त्याने ५९ चेंडूंत ४ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीनं ९५ धावांची वादळी अर्धशतकी खेळी केली. भुवनेश्वर कुमारने बटलरला बाद केले आणि राजस्थानला मोठा धक्का दिला, पण संजू सॅमसनने शेवटच्या षटकातही चौकार, षटकारांचा पाऊस पाडला अन् राजस्थानची धावसंख्या दोनशे पार करण्यात यशस्वी ठरला. त्याने ३८ चेंडूंत ५ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने ६६ धावांची नाबाद खेळी केली. त्यामुळे राजस्थानने २० षटकांत २ विकेट्स गमावत २१४ धावांपर्यंत मजल मारली.




# पनवेल चॅम्पियन्स लीगचा 'स्मित स्मॅशर्स' मानकरी

## मनपा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. (टीआयपीएल) च्या सौजन्याने पनवेल चॅम्पियन्स लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत स्मित स्मॅशर्स संघाने विजेतेपद पटकाविले, तर अमल इलेव्हन संघ उपविजेता ठरला. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते त्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पनवेल महापालिका कार्यालयाच्या बाजूला असलेल्या छत्रपती संभाजी महाराज मैदानात ही दोन दिवसयीय क्रिकेट स्पर्धा रंगली. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) झाला. या वेळी विजेत्या स्मित स्मॅशर्स संघाला ४० हजार रुपये व सन्मानचिन्ह आणि उपविजेत्या अमल इलेव्हन संघाला २० हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास माजी नगरसेवक मुकित काझी, इक्बाल काझी, युवा नेते केदार भगत, राजू पटेल, सुफियान पटेल, अस्लम मास्तर, आतिफ मस्ते आदी उपस्थित होते.

# 'डब्ल्यूटीसी' फायनलसाठी राहुलच्या जागी ईशानला संधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुखातपतीमुळे केएल राहुल वर्ल्ड टेस्ट चॅम्पिनशीपच्या फायनलमधून बाहेर पडला आहे. बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिली असून राहुलच्या जागी ईशान किशन याला संधी दिली आहे.

आरसीबीविरोधातील सामन्यादरम्यान राहुल दुखापतग्रस्त झाला होता. त्यानंतर तो उर्वरित आयपीएल आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पिनशीपला मुकला आहे. बीसीसीआयने राहुलच्या जागी ईशान किशन याची निवड केली आहे. ईशान सलामीला चांगला पर्याय आहे. सलामीला व मधल्या फळीत तो उपयुक्त ठरू शकतो. टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बहुप्रतिक्षित वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना लंडनच्या ओव्हल येथे खेळवण्यात येणार आहे. ७ जूनपासून सामना खेळवला जाणार आहे. आता विजय मिळवून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या ट्रॉफीवर नाव कोण कोरणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**भारतीय संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, अजिंक्य रहाणे, केएस भरत, इशान किशन (विकेटकिपर), रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, मोहम्द शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव, जयदेव उनाडकट.

# संदीप शर्माचा नो बॉल हैदराबादला महागात!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात रविवारी रोमहर्षक सामना झाला. शेवटच्या चेंडूवर हैदाबादला विजयासाठी पाच धावांची आवश्यकता असताना राजस्थानचा गोलंदाज संदीप शर्माने नो बॉल फेकला. या चेंडूवर हैद्राबादचा अब्दुल समद बाद झाला होता, परंतु अंपायरने तो चेंडू नो बॉल असल्याचे सांगितले अन् सामना फिरला.

समदने त्यानंतर शेवटच्या चेंडूवर गगनचुंबी षटकार ठोकून हैदराबादला विजयी लक्ष्य गाठून दिले. संदीप शर्माने फेकलेला नो बॉल अन् त्यानंतर समदने मारलेला विजयी षटकार हे संपूर्ण थरारक दृष्य कॅमेऱ्यात कैद झाले असून व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. हैदराबाद कठीण परिस्थितीत असताना फिलिप्सने ७ चेंडूत २७ धावा कुटल्या, तर समदने ७ चेंडूत १७ धावांची नाबाद खेळी केली.

सामन्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसन म्हणाला, सामना जिंकण्याच्या स्थितीत असताना तुम्ही रेषेच्या बाहेर जाऊन गोलंदाजी करू शकत नाही, परंतु समदने जीवदान मिळाल्यावर हैदराबादला विजय मिळवून दिला. आयपीएलमध्ये असे रंगतदार सामने होतात.

# यशस्वी जैस्वालकडून दोन खास विक्रमांना गवसणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सचा सलामीवीर युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल याने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध रविवारी झालेल्या सामन्यात त्याच्या आयपीएल करिअरमधील एक हजार धावा पूर्ण केल्या. हा पराक्रम करीत जैस्वालने दोन खास विक्रमांना गवसणी घातली आहे.

या सामन्यात जैस्वालला आयपीएल करिअरमधील एक हजार धावा पूर्ण करण्यासाठी ११ धावांची आवश्यकता होती, ज्या त्याने सामन्याच्या सुरुवातीलाच केल्या. जैस्वालने १८ चेंडूंत पाच चौकार आमि दोन षटकारांच्या मदतीने ३५ धावांची खेळी केली. जैस्वालने एक हजार धावा पूर्ण करण्यासाठी ३४ इनिंग खेळल्या. तो या टूर्नामेंटमध्ये सर्वांत कमी इनिंगमध्ये या धावांचा आकडा पार करणारा चेन्नई सुपर किंग्जचा माजी फलंदाज सुरेश रैनानंतर भारताचा दुसरा खेळाडू बनला आहे.

आयपीएलमध्ये भारतीय फलंदाजाकडून सर्वांत कमी इनिंगमध्ये एक हजार धावा करण्याचा विक्रम संयुक्तपणे सचिन तेंडुलकर आणि ऋतुराज गायकवाड यांच्या नावावर आहे. त्यांनी हा विक्रम ३१ इनिंगमध्ये केला आहे. यशस्वी जैस्वाल या मेगा लीगमध्ये सर्वांत कमी वय असताना एक हजार धावा करणारा दुसरा भारतीय फलंदाज बनला आहे. आयपीएलमध्ये सर्वांत कमी वयात १ हजार धावा करण्याच्या यादीत ऋषभ पंत पहिल्या स्थानावर आहे. त्याने २० वर्ष २१८ दिवसांचे वय असताना हा पराक्रम करून दाखवला आहे. जैस्वालने पृथ्वी शॉला मागे टाकले.

# वनडेतील नंबर वन संघाचा मुकुट पाकिस्तानकडून हिरावला; अवघ्या ४८ तासांत मोठा फेरबदल

**दुबई : वृत्तसंस्था**

पाकिस्तानला प्रथमच एकदिवसीय क्रमवारीत नंबर वन होण्याची संधी मिळाली होती, मात्र पाकिस्तानी संघ हा मुकुट दोन दिवसांपेक्षा जास्त काळ राखू शकला नाही. अवघ्या ४८ तासांत पाकिस्तानचे एकदिवसीय क्रमवारीत नंबर वन पद गेले असून ते तिसऱ्या क्रमांकावर घसरले आहेत.

पाकिस्तानचा संघ भारत आणि ऑस्ट्रेलियाला मागे टाकून आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत प्रथमच पहिल्या क्रमांकाचा संघ बनला. यावर पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी ट्वीट करून संघाचे कौतुक केले. त्यानंतर संपूर्ण पाकिस्तानमध्ये जल्लोषाचे वातावरण तयार झाले होते, मात्र नंबर वनचा मुकुट त्यांच्या संघाने दोन दिवसांतच गमावला. रविवारी न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात पाकिस्तानला ४७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या पराभवामुळे पाकिस्तानचा संघ एकदिवसीय क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर घसरला आणि ऑस्ट्रेलिया पुन्हा किंग बनला.

विशेष म्हणजे ४८ तासांच्या आत म्हणजेच ७ मे रोजी भारतीय क्रिकेट संघ एकही सामना न खेळता आहे त्या स्थानी पोहचला, तर पाकिस्तानबाबतही असेच घडले. खरेतर न्यूझीलंडविरुद्धच्या वन डे मालिकेतील चौथ्या सामन्यात पाकिस्तान संघाने न्यूझीलंडचा १०२ धावांनी पराभव केला. या विजयानंतर बाबर आझमचा संघ नंबर वन झाला. त्यानंतर भारतीय संघ तिसऱ्या क्रमांकावर घसरला होता आणि त्यामुळे पाकिस्तानमध्ये आनंद साजरा झाला होता. या मालिकेनंतर पाकिस्तानच्या क्रमवारीत नक्कीच सुधारणा झाली आहे. मालिका सुरू होण्यापूर्वी पाकिस्तान १०६ गुणांसह क्रमवारीत पाचव्या स्थानावर होता. न्यूझीलंडचा १–४ असा पराभव केल्यानंतर पाकिस्तानचे ११२ गुण झाले आहेत. पुढील एकदिवसीय मालिकेत पाकिस्तानला पुन्हा अव्वल स्थान मिळवण्याची संधी आहे.



### ऑस्ट्रेलिया संघ अग्रस्थानी

पाकिस्तानच्या पराभवानंतर ऑस्ट्रेलिया पुन्हा एकदा वन डे क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आला आहे. रँकिंगमध्ये ऑस्ट्रेलिया ११३ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारताला सध्या एकही एकदिवसीय मालिका खेळायची नसल्याने प्रथम क्रमांकाचा मुकुट मिळवण्याची संधी मिळणार नाही. न्यूझीलंड पाचव्या स्थानावर कायम आहे, परंतु आता त्यांचे रेटिंग १०७ वरून १०८ पर्यंत सुधारले आहे. ते १११ गुणांसह चौथ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडच्या मागे आहेत. या वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या दृष्टीने ही क्रमवारी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जो संघ क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असेल तो अधिक आत्मविश्वासाने विश्वचषक स्पर्धेत प्रवेश करेल.

# कबड्डी स्पर्धेत नवतरुण पायरवाडी संघ विजेता





**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील सागवाडी येथील श्री गणेश क्रीडा मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आदिवासी, कातकरी, ठाकूर समाजाच्या कबड्डी स्पर्धेत पेण तालुक्यातील नवतरुण पायरवाडी संघाने विजेतेपद पटकावले. गावदेवी कातळावाडी संघ उपविजेता ठरला. जय हनुमान हेदेशी संघाने तृतीय, तर जय म्हसोबा बार्शीत संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

सागवाडी येथे खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत अलिबाग, पेण, मुरूड, रोहा, कर्जत, तालुक्यातील आदिवासी, ठाकूर, कातकरी समाजातील संघ सहभागी झाले होते. भारतीय जनता पश्र दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी पहिली चार पारितोषिके दिली. त्यांच्याच हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

भाजप नेते व वरंडे ग्रामपंचायतीचे सरपंच सुधीर चेरकर, भाजप ओबीसी सेल अलिबाग तालुकाध्यक्ष अशोक वारगे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र चेरकर, भाजप नेते सर्वेश पाटील, राकेश अवचटकर, जगदीश मानकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सागवाडी ग्रामस्थ बाळाराम शिद, हरी शिद, देवजी हंबीर, हेमंत निरगुडा, नारायण शिद, राम शिद, कृष्णा पिंगळा, यशवंत पिंगळा, बाळू शिद, प्रवीण निरगुडा, हरी शिद, जयवंत लेंडी, दामा शिद, रामा सोनार, धर्मा निरगुडा, जगदीश मानकर, लक्ष्मण शिद, किशोर पिंगळा, मधुकर पिंगळा, परेश शिद, रमेश शिद, प्रकाश पिंगळा, कैलास पिंगळा, हिरामण सोनार, रवी हंबीर, विश्वास सोनार, हशा शिद, नामदेव निरगुडा आदी उपस्थित होते.

# कोल्ड वॉर सुरूच; विराटने साधला निशाणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि लखनऊ सुपर जायंट्सचा मार्गदर्शन गौतम गंभीर त्यांच्यातील वाद आता सोशल मीडियावर शीतयुद्ध झाला आहे. लखनऊ संघाचा खेळाडू नवीन उल हकनंतर आता विराटच्या पोस्टने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

लखनऊमधील सामन्यानंतर विराट आणि गौतम यांच्यात वाद झाला होता, ज्यामध्ये लखनऊ संघाचा वेगवान गोलंदाज नवीन मुख्य भूमिकेत होता. त्या भांडणानंतर आता सोशल मीडियावर दोन्ही बाजूंनी हालचाली होताना दिसत आहेत. गुजरात टायटन्सचा गोलंदाज राशिद खानने लखनऊच्या फलंदाजीदरम्यान सलामीवीर काइली मेयर्सचा उत्कृष्ट झेल घेतला तेव्हा विराटने पुन्हा एक पोस्ट शेअर केली. जरी या गोष्टी साध्या वाटत असल्या तरी कोहलीचा बदला म्हणून याकडे पाहिले जात आहे, कारण कोहली सहसा इतर संघांच्या सामन्यांबद्दल काहीही पोस्ट करीत नाही.

जीवेत् शरदः शतम्!



किशोर वाहळकर
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
मयुरेश शेळके

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com